म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२५०२

[illegible]

REFBK-0020252
REFBK-0020252

# समर्थांचें अतिसंक्षिप्त चरित्र.

मोंगलाईंत राक्षसभुवनापासून वीस कोसांवर औरंगाबाद जिल्ह्यांत आंबड परगण्यांत गोदावरी नदीनजीक जांब नांवाचें गांव आहे. तेथें शके १५३० सालीं चैत्र शुद्ध नवमीचे दिवशीं दुपारीं रामजन्माचें वेळीं समर्थांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचें नांव सूर्याजीपंत कुलकर्णी उपनांव ठोसर, ते जमदग्नि गोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ते सूर्योपासक होते. समर्थांच्या आईचें नांव राणुबाई. समर्थांचें मूळ नांव नारायण होतें. ते रामाची उपासना करूं लागले म्हणून पुढें त्यांना रामदास म्हणूं लागले. समर्थांच्या वडिल बंधूचें नांव गंगाधर. त्यांनांच पुढें रामीरामदास व श्रेष्ठ म्हणूं लागले. श्रेष्ठांचा जन्म शके १५२७ सालीं झाला. हल्लींचे चाफळचे स्वामी हे श्रेष्ठांचे वंशज आहेत. समर्थांचें लग्न त्यांच्या बाराव्या वर्षी ह्मणजे शके १५४२ सालीं ठरलें होतें. लग्नाच्या वेळीं वधुवरांमध्यें अंतरपाठ धरून ब्राह्मण सुमुहूर्त सावधान ह्मणत असतां समर्थ सावध होऊन लग्नसमारंभातून पळून पंचवटीस गेले व तेथें त्यांनीं बारा वर्षे पुरश्चरण केलें.

शके १५५४ नंतर बारा वर्षे सर्व भरतखंडांत तीर्थयात्रा करून शके १५६६ सालीं समर्थ कृष्णातीरीं आनंदभु-

...ा आले. १५६७–७२ पर्यंत समर्थांनीं बारा मारुती स्थापन केले व १५७०मध्यें चाफळ येथें श्रीरामउत्सवास सुरवात झाली. नाशकापासून कोल्हापुरापर्यंत महाराष्ट्रास समर्थ आनंदभुवन ह्मणतात. बारा वर्षांच्या प्रवासांत त्यांना हिंदूधर्माची व हिंदूसमाजाची हीन स्थिती झालेली ओंळखून आली. त्याचें वर्णन त्यांनीं दासबोधांत काहीं समासांत व स्फुटकाव्यांतही केलें आहे. तीर्थयात्रा करून महाराष्ट्रांत परत आल्यावर ठिकठिकाणीं मठ स्थापून समर्थांनीं धर्मसंस्थापना करण्यास सुरवात केली. मारुतीचीं व रामाचीं देवालयें स्थापून हनुमज्जयंतीचे व रामजयंतीचे उत्सव सुरूं करून लोक सदाचरणाकडे लावले. " स्वयें करुनी बोलणें " अशी त्यांची पद्धत असल्यामुळें " नभामाजीं तारांगणें " असा त्यांना शिष्यवर्ग मिळाला. शिवाजी महाराजांची समर्थांच्या शिष्यांत गणना आहे. शिवाजीमहाराजांनीं सर्व राज्य समर्थांच्या झोळींत भिक्षेस घातलें; समर्थांनीं राज्य परत देऊन भगव्या रंगाचें निशाण ठेवण्यास सांगितलें. मराठ्यांचा " भगवा झेंडा " इतिहासप्रसिद्ध आहे. समर्थांनीं अकराशें मठ स्थापन केले. चाफळ हें सर्व मठांचें आदिपीठ. तेथें खुद्द समर्थ बरेंच दिवस राहात असत. नंतर शिवाजीमहाराजांच्या विनंतीवरून साताऱ्यानजीक परळीस राहूं लागले ह्मणून परळीस सज्जनगड हें नांव पडलें. येथें १६०३ सालीं माघ वद्य नवमीस समर्थांनीं समाधी घेतली.

ॐ

बालबोध

# समर्थ-वाङ्मय-माला.

पुष्प २ रें.

## –र्थ सुभाषित

REFBK-0020252

REFBK-0020252 ग १ ला.

### मनाच्या श्लोकांतील सुभाषितें.

( या भागात मनाच्या २०५ श्लोकांतील सुभाषित वजा ४० श्लोक घेतले आहेत)

मना सज्जना, भक्तिपंथेंचि[1] जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें[2] ॥
जनीं निंद्य[3] तें सर्व सोडूनि द्यावें ।
जनीं वंद्य[4] तें सर्व भावें करावें ॥ १ ॥
प्रभातें[5] मनीं राम चिंतीत जावा ।
पुढें वैखरी[6] राम आधीं वदावा[7] ॥

१ भक्तिमार्गानेच २ सहज, श्रम न करतां ३ वाईट ४ चांगले ५ प्रातःकाळीं ६ वाणीनें ७ म्हणावा.

सदाचार[1] हा थोर सांडूं नये तो ।
जगीं तोचि तो मानवी[2] धन्य[3] होतो ॥ २ ॥
मना वासना[4] दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ॥
मना धर्मता[5] नीति सोडूं नको हो ।
मना अंतरीं[6] सार[7] वीचार राहो ॥ ३ ॥
मना पापसंकल्प[8] सोडूनि द्यावा ।
मना सत्यसंकल्प[9] जीवीं धरावा ॥
मना कल्पना ते नको वीषयाची ।
विकारें[10] घडे हो जनीं सर्व ची ची[11] ॥ ४ ॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना विकारीं ॥
नको रे मदा सर्वदा अंगिकारूं[12] ।
नको रे मना मत्सरू, दंभ भारू[13] ॥ ५ ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नीच[14] सोशीत जावें ॥

---

१ चांगला आचार २ मनुष्य ३ कृतकृत्य ४ इच्छा ५ धर्मबुद्धि ६ अंतःकरणांत ७ सत्य, श्रेष्ठ ८ खोटा ( मायिक ) विचार ९ खरा ( ब्रह्माचा ) विचार १० विकार वश झाल्याने ११ फजिती १२ स्वीकारूं १३ भारी, मोठा १४ वाईट-हलकट.

स्वयें सर्वदा नम्र वाचे ॰माचा ।
मना सर्व लोकांसि रे ॰त्तमाचा ॥ १४ ॥
तनू -त्यागितां की॰ चालताहे ।
मना सज्जना हे॰ देवासि पाहे ॥
मना चंदनाचे लेश नाहीं श्रमाचा ।
परी अंतरीं ॰ दास सर्वोत्तमाचा ॥ १५ ॥
जगीं सर्व ॰ कामकारी[2] विकारी ।
विचारें ॰ जो तापसी ब्रह्मचारी ॥
मना ॰श[3] मनीं, लेश नाहीं श्रमाचा ।
तया॰ धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १६ ॥
म॰ मत्सरें सांडिला स्वार्थबुद्धी[4] ।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी[5] ॥
सदा सर्वदा नम्र वाचा सुवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १७ ॥
सदा आर्जवी प्रीय जो सर्वलोकीं ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥

---

१ श्रीरामाच्या सगूण रूपाला २ काम उत्पन्न करणारा विकार ज्याच्या अंतःकरणांत नाहीं ३ समाधान पावला ४ स्वार्थबुद्धीनें ( तृतीया ) ५ उपसर्ग, त्रास.

सदाचार[1] हा न्य वाचे वदावें ।
जगीं तोचि तो न्य सोडूनि द्यावें ॥ १० ॥
मना वासना[4] दुष्ट वक्र[5] पाहे ।
मना सर्वथा पापबुद्धी[7] आहे ॥
मना धर्मता[5] नीति सोडूंक तीन्हीं ।
मना अंतरीं[6] सार[7] विचारानी ॥ ११ ॥
मना पापसंकल्प[8] सोडूनि द्या ।
मना सत्यसंकल्प[9] जीवीं धराव।
मना कल्पना ते नको विषयाची
विकारें[10] घडे हो जनीं सर्व ची ॥ १२ ॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना विकारीं ॥
नको रे मदा सर्वदा अंगिकारू[12] ।
नको रे मना मत्सरू, दंभ भारू[13] ॥ ५॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नीच[14] सोशीत जावें ॥

---

१ चांगला आचार २ मनुष्य ३ कुतर्कल्प ४ वैन ५. धर्मबुद्धि ६ अन्तःकरणांत ७ सत्य, श्रेष्ठ ८ खोटा ( माथेफिरू ) विचार ९. खरा ( ब्रह्माचा ) विचार १० विकार वश झाल्या ११ फजिती १२ स्वीकारू १३ भारी, मोठा १४ वाईट-हलकट

स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १४ ॥
सदा बोलण्यासारिखे चालताहे ।
अनेकीं सदा एक देवासि पाहे ॥
सगूणीं[1] भजे, लेश नाहीं भ्रमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १५ ॥
नसे अंतरीं कामकारी[2] विकारी ।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ॥
निवाला[3] मनीं, लेश नाहीं भ्रमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १६ ॥
मदें मत्सरें सांडिला स्वार्थबुद्धी[4] ।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी[5] ॥
सदा सर्वदा नम्र वाचा सुवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १७ ॥
सदा आर्जवी प्रीय जो सर्वलोकीं ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥

---

१ श्रीरामाच्या सगूण रूपाला २ काम उत्पन्न करणारा विकार ज्यान्च्या अंत.करणांत नाहीं ३ समाधान पावला ४ स्वार्थबुद्धीनें ( तृतीया ) ५ उपसर्ग, त्रास.

न बोले कदा मिथ्यवाचा[1] त्रिवाचा[2] ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १८ ॥
दिनाचा दयाळू, मनाचा मवाळू[3] ।
स्निहाळू[4], कृपाळू, जगीं दासपाळू ॥
तया अंतरीं क्रोध, संताप कैंचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १९ ॥
अती मूढ त्या, दृढ बुद्धी असेना ।
अती काम[5] त्या, राम चित्तीं असेना ॥
अती लोभ त्या, क्षोभ[6] होईल जाणा ।
अती वीषयी, सर्वदा दैन्यवाणा[7] ॥ २० ॥
सुखानंदकारी निवारी[8] भयातें ।
जनीं[9] भक्तिभावें भजावें तयातें ॥
विवेकें त्यजावा अनाचार[10] हेवा ।
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥ २१ ॥
सदा रामनामें वदा पूर्णकामें[11] ।
कदा बाधिजेनापदा[12] नित्यनेमें ॥

---

१ खोटें बोलणें २ निश्चयानें ३ कोमल ४ स्नेहाळू क. पाठ ५ विषय वासना ६ संताप ७ करंटा ८ दूर करी ९ लोकांनां नृतांयेसारखा उपयोग १० दुष्ट आचार ११ इच्छा पूर्ण करणारी १२ बाधिजेना + आपदा [ संकटें ]

मदालस्य* हा सर्व सोडूनि द्यावा ।
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥ २२ ॥
जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।
अती आदरें गद्यघोषें[1] ह्मणावें ॥
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥ २३ ॥
अती लीनता सर्वभावें[2] स्वभावें[3] ।
मना[4], सज्जनालागि संतोषवावें ॥
देह कारणीं[5] सर्व लावीत जावें ।
सगूणीं अती आदरेंसीं[6] भजावें ॥ २४ ॥
हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी ।
देहबुद्धि नीरूपणीं[7] वीसरावी ॥
परद्रव्य आणिक[8] कांता परावी[9] ।
यदर्थीं[10] मना सांडि[11] जीवीं करावी ॥ २५ ॥
क्रियेवीण नानापरी बोलिजेते ।
परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें ॥

---

१ मोठी गर्जना करून २ एकभावानें ३ सहज ४ जना क. पाठ ५ सत्कारणीं ६ आदरानें ७ अद्वैत चर्चेत ८ आणखी ९ दुसऱ्याची १० या ( दोन ) गोष्टी मिळविण्यांत = या गोष्टीमध्यें ११ त्याग, विसर. * मद + आलस्य

मना कल्पना धीट सैराट[1] धांवे ।
तया मानवा देव कैसेनि पावे ॥ २६ ॥
विवेकें क्रिया आपुली पालटावी ।
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ॥
जनीं बोलण्यासारिखे चाल बापा ।
मना कल्पना सोडि संसारतापा ॥ २७ ॥
बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा[2] ।
विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा[3] ॥
दया सर्वभूतीं जया मानवाला ।
सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ॥ २८ ॥
सदा सर्वदा सज्जनांचेनि[4] योगें ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ[5] लागे[6] ॥
क्रियेवीण वाचाळता[7] ते निवारी ।
तुटे वाद संवाद तो हितकारी ॥ २९ ॥
फुकाचें[8] मुखीं बोलतां काय वेचे[9] ।
दिसंदिस[10] अभ्यंतरीं गर्व साचे[11] ॥

---

१ स्वच्छंदीपणानें २ तृतीयेसारखा उपयोग एक निष्ठेनें ३ सगुण अगर निर्गुण रूपापासून दूर झालेल्या [ भ्रष्ट ] ४ सज्जनांच्या संगतीनें [ योगें ] ५ भक्ति व भाव याचा अर्थ फायदा-जोड ६ सांपडतो ७ वडबड ८ फुकट ९ खर्च होते १० दिवसेंदिवस ११ साठतो.

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारें तुझा तूंचि शोधूनि पाहे ॥ ३० ॥
मना, वासना वासुदेवीं वसों दे ।
मना, कामना कामसंगीं नसों दे ॥
मना, कल्पना वाउगी[1] ते न कीजे ।
मना सज्जना, सज्जनीं वस्ति कीजे ॥ ३१ ॥
विचारूनि बोले विवंचूनि[2] चाले ।
तयाचेनि संतप्त[3] ते ही निवाले ॥
बरें शोधिल्यावीण बोलों नये हो ।
जनीं बोलणें शुद्ध नेमस्त राहो ॥ ३२ ॥
नसे गर्व अंगीं, सदा वीतरागी[4] ।
क्षमा-शांति-भोगी दयादक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।
यहीं[5] लक्षणें जाणिजे योगिराणा ॥ ३३ ॥
नव्हे पिंडज्ञानें[6], नव्हे तत्वज्ञानें ।
समाधान कांहीं नव्हे, तानमानें[7] ॥
नव्हे योगयागें[8], नव्हे भोगत्यागें ।

---

१ व्यर्थ २ विचार करून ३ तापभयानें पोळलेले ४ गेलेले आहे [ वीत ] संसारावरील प्रेम [ राग ] ज्याचें असा ५ या ६ पिंड = शरीर ७ गायनादि कलांनीं ८ याग = यज्ञ.

समाधान तें सज्जनाचेनि योगें ॥ ३४ ॥
जयें मक्षिका भक्षिली जाणिवेची[1] ।
तया भोजनाची रुची प्राप्ति कैंची ॥
अहंभाव ज्या मानसीचा विरेना[2] ।
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥ ३५ ॥
तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले ।
तया देवरायासि कोणी न बोले ॥
जगीं थोरला देव तो चोरिलासे ।
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥ ३६ ॥
गुरू पाहतां पाहतां लक्ष कोटी ।
बहूसाल[3] मंत्रावळी[4] शक्ति मोठी ॥
मनीं कामना[5] चेटकें[6] धातमाता[7] ।
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥ ३७ ॥
नव्हे चेटकी चाळकू[8] द्रव्यभोंदू[9] ।
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू[10] ॥

---

१ मी ज्ञानी आहे अशा अभिमानाची  २ नाहींसा होईना ३ पुष्कळ प्रकारचे ४ मंत्र+आवळी=मंत्राच्या ओळी = पुष्कळ मंत्र ५ क्षुद्रवासना ६ देव घालणें  ७ धात = कल्पित गोष्ट मात घडलेली गोष्ट ८ फसव्या ९ पैसे उपटणारा १० भक्तिशून्य.

नव्हे उन्मतू[१], वेसनी[*] संगबाधू[२] ।
जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू ॥ ३८ ॥
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।
कृपाळू मनस्वी[३] क्षमावंत योगी ॥
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे ।
तयाचेनि योगें समाधान बाणे[४] ॥ ३९ ॥
वसे हृदयीं देव तो जाण ऐसा ।
नभाचेपरी[५] व्यापकू जाण तैसा ॥
सदा संचला येत ना जात नाहीं ।
तयावीण कोठें रिता[६] ठाव नाहीं ॥ ४० ॥

---

१ अहंकारानें उन्मत्त २ आपल्या संगतीनें बाधा करणारे ३ मन स्वाधीन ठेवणारा ४ ठसते ५ आकाशासारखा ६ रिकामा.
* व्यसनी.

# भाग २ रा.

## राममंत्राच्या श्लोकांतील सुभाषितें.

( या भागांत राममंत्राच्या ४९ श्लोकांतील सुभाषित वजा ११ श्लोक घेतले आहेत )

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति[1] मोठी ।
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं[2] ॥
कसा कोणता नेणवे आजपा[3] रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १ ॥
तुला ही तनू[4] मानवी[5] प्राप्त झाली ।
बहू-जन्म-पुण्यें फळालागिं आली ॥
तिला तूं कसा गोंवसी[6] वीषयीं रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २ ॥
दुराशा[7] नको रे परस्त्रीधनाची ।
नको तूं करी नीच सेवा जनाची ॥
पराधीन कैसा भला दीससी रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३ ॥

---

१ व्याकरण शास्त्र २ अंतःकरणांत ३ एकांतांत श्वासोच्छ्वास करीत असतां " सोऽहं " असा उच्चार होतो त्यास अजपा मंत्र म्हणतात ४ शरीर ५ मनुष्याचें ६ गुंतवीसी ७ दुष्ट आशा.

मदें डोलसी, बोलसी साधु-वृंदा[1] ।
कसें हीत तूं नेणसी बुद्धिमंदा ॥
रिकामाचि तूं गुंतसी वाउगा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४ ॥
बहू इच्छिसी कीर्ति सन्मान कांहीं ।
सुखाचा तुला अंतरीं लेश नाहीं ॥
फुकाचें मुखीं नाम तें कां नये रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ५ ॥
नको वीषयीं फारसा मस्त होऊं ।
नको मानदंभामधें चित्त गोवूं ॥
नको भस्म लावूं, जटाभार कां रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ६ ॥
नको योग अष्टांग[2] तो रोध[3] प्राणा ।
नको कृच्छ्र[4] चांद्रायणी[4] हट्ट जाणा ॥
कलायुक्त चातुर्य तें वीकळा[5] रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ७ ॥

---

१ संतांचे समुदाय   २ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी, असे योगाचें आठ प्रकार ( अंगें ) ३ कोंडणें ४ विशिष्ट प्रकारचें व्रत ५ कलारहित.

नसे सत्य कांहीं दिसे दो[1] दिसांचे[2] ।
तुला लूटती चोरटे लोक साचे[3] ॥
स्त्रिया पुत्र कामा[4] न येती तुला रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ८ ॥
तुला यम पाशीं[5] करी बद्ध जेव्हां ।
सखा कोणता सोडवी सांग तेव्हां ॥
यमाला कदापी दया ते नये रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ९ ॥
बहू कामधंद्यामधें धांव घेसी ।
किती नांवरूपा जगीं मीरवीशी ॥
कशाला तुला उंट घोडे नगारे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १० ॥
अलंकारस्थानीं तनू सज्जवीसी ।
मना दर्पणीं पाहुनी रंजवीसी ॥
कळेना, जळे सर्पणीं रूप तें रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ११ ॥

---

१ दोन २ दिवसांचे ३ खरोखर ४ उपयोगास ५ जाळ्यांत ६ मित्र.

# भाग ३ रा.

## स्फुट अभंग

### देहाची क्षणभंगुरता.

(१) काळ[1] जातो क्षणक्षणा । मूळ[2] येईल मरणा ॥१॥
कांहीं धांवाधांव करी । जंव तो काळ[3] आहे दुरी २
देह आहे जाईजणें[4] । भुललासी कवण्या गुणें ॥३॥
मायाजाळीं गुंतलें मन । परी हें दुःखासी कारण ॥४॥
सत्य वाटतें सकळ । परी जातां नाहीं वेळ ॥ ५ ॥
रामीं रामदास ह्मणे । आतां सावधान होणें ॥ ६ ॥

(२) डोळे चिरींव[5] चांगले । वृद्धपणीं सरक्या[6] झाले ॥१॥
ओले मातीचा[7] भरंसा । काय मानीसी माणसा ॥२॥
मुख रसाळ चांगलें । पुढें अवघें सुकूतलें ॥ ३ ॥
रम्य नासीक[8] सरळें । सर्वकाळ पाणी गळे ॥ ४ ॥
कर्णभूषणें सुंदर । पुढें जाहली बधिर ॥ ५ ॥
बरवी[9] दातांची पंगती[10] । परि ते उन्मळोनि[11] पडती ६

---

१ वेळ  २ बोलावणें  ३ मरण  ४ क्षणभंगुर  ५ सुरेख
६ वाईट सरकासारखे  ७ देहाचा-देहरूपमातीचा  ८ नाक
९ चांगली १० पंक्ति = ओळ ११ उपटून.

बरवे कर[1] आणि चरण[2] । परि ते झाले निष्कारण ७
अंग-कांती[3] होती बरी । झाली चिरगुटाचे परी ॥८॥
केश होताती पांढरे । लाळ गळतां ना धेर ॥ ९ ॥
बहुसाल[4] होतें बळ । पुढें जाहलें निर्बळ ॥ १० ॥
देह होतें जें निर्मळ । तेंचि झालें अमंगळ[5] ॥ ११ ॥
सर्व तारुण्यें चांगला । प्राणी दीनरूप झाला ॥ १२ ॥
रामी रामदास ह्मणे । आतां सावधान होणें ॥ १३॥

(३) लक्ष्मी आहे रे चंचळ। इस जातां नाहीं वेळ ॥१॥
सत्य मानावें उत्तर । देव आहे निरंतर ॥ २ ॥
नाना वैभवें समस्तें । येती जाती अकस्मातें[6] ॥ ३ ॥
ह्मणे रामी रामदास । काय देहाचा विश्वास ॥ ४ ॥

(४) नद्या मर्यादा[7] सांडिती । उष्णकाळीं वोस[8] होती १
तारुण्याचा भर[9] । सर्वेचि[10] होतसें उतार[11] ॥ २ ॥
भाग्य चढे लागवेगें[10] । सर्वेचि प्राणी भीक मागें ॥३॥
दास म्हणे काळ । दोन दिवस पर्वकाळ ॥ ४ ॥

---

१ हात २ पाय ३ तेज ४ पुष्कळ ५ घाणेरडें
६ एकदम ७ दोन तीरांची मर्यादा ८ रिकाम्या ९ भार
१० लागलींच ११ उतरती कळा

(५) पुरें[१] पट्टणें[१] वसती । एक वेळ वोस होती ॥ १ ॥
तैसें वैभव सकळ । येतां जातां नाहीं वेळ ॥ २ ॥
बहु सृष्टीची रचना । होय जाय क्षणक्षणा ॥ ३ ॥
दास ह्मणे चक्रवर्ती[२] । आले गेले सांगों किती ॥४॥

## चित्तशुद्धि.

(१) ऐसें कैसें रे सोंवळें । शिवतां होतसें ओंवळें १
स्नानसंध्या टिळे[३] माळा । पोटीं क्रोधाचा उमाळा[४] ॥२॥
नित्य दंडितोसी[५] देह । तरी फिटेना संदेह ॥ ३ ॥
बाह्य[६] केली झळफळ[७] । देह बुद्धीचा विटाळ ॥ ४ ॥
नित्यनेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥ ५ ॥
रामदासीं दृढ भाव । तेणेंविण सर्व वाव ॥ ६ ॥
(२) गेला संदेहाचा मळ । तेणें निःसंग निर्मळ ॥१॥
बाह्य गंगा-जळ-स्नान । चित्त शुद्ध ब्रह्मज्ञान ॥ २ ॥
सर्व काळ कर्मनिष्ठ । सर्व साक्षित्वें वरिष्ठ ॥ ३ ॥
रामदासीं स्नानसंध्या । सुत करी माता वंध्या[८] ॥ ४ ॥

## चांडाळ.

(१) ज्याच्या उदरासी आला । त्यासी फिरोनि पडला

---

१ शहरें २ सम्राट राजे = महाराजांचे महाराज ३ गंधाचे टिळे ४ भर ५ कष्टवितोस ६ वरवर ७ स्वच्छता ८ संतान-रहित स्त्री.

तोचि जाणावा चांडाळ । देव-ब्राह्मणांचा काळ ॥२॥
झाला स्त्रियेसी लंपट । मायबापासी उद्धट ॥ ३ ॥
भय पापाचें न धरी । सज्जनाची निंदा करी ॥ ४ ॥
नेणें माय कीं मावशी । कोणें सांगावें तयासी ॥ ५ ॥
रामदास-म्हणे । यम केला त्या कारणें ॥ ६ ॥

### कष्ट = प्रयत्न.

(१) निज सलगीचें[1] जाणेना । पुढें कोणासी मानेना १
आळसी निकामा माणुस । पुढें होतो कासावीस ॥ २ ॥
उगेंच नाचतें मुरडतें । कोण पूसतें[2] नयातें ॥ ३ ॥
आधीं कष्टावें रगडावें । कार्य बहुताचें करावें ॥ ४ ॥
बहुतांसी मिळो[3] जाणें । त्यासि मानीती शहाणे ॥५॥
बहुतां मानला तो ल्याख[4] । वरकड[5] जाणावें नल्याख[6] ६
आहे प्रगट उपाय । दास म्हणे सांगो काय ॥ ७ ॥
(२) कष्ट करितां मनीं विटे । तरी तो कळेल शेवटें १
कष्टें उदंड आटोपावें । तरि मग पुढें सुखी व्हावें ॥२॥
शहाणे उदंड कष्टती । वडिल उपकारें दाटती ॥३॥
बहुत राखिले लौकिक[7] । त्याचें जिणें अलौकीक ॥४॥

---

१ स्नेहाचें २ विचारतें ३ मनासारखें वागणें ४ लायख, योग्य ५ बाकीचे ६ नालायख ७ लोकाचार ८ श्रेष्ठ.

ज्यास त्यास पाहिजे तो । जनीं वाटपास येतो ॥ ५ ॥
मनोगत[1] जाणें सूत्रें[2] । जेथें तेथें जगमित्रें ॥ ६ ॥
न सांगतां काम करी । ज्ञान उदंड विवरी[3] ॥ ७ ॥
स्तुति कोणाची न करी । प्राणिमात्रा[4] लोभ करी ॥८॥
जनीं बहुतचि साहतो[5] । कीर्तिरूपेंचि राहतो ॥ ९ ॥
दास म्हणे नव्हे दुःखी । आपण सुखी जग सुखी ॥१०॥

**भाव.**

(१) गेलों काशी-विश्वेश्वरा । सेतुबंध रामेश्वरा ॥ १ ॥
तरी संशय तुटेना । पूर्वगुण पालटेना ॥ २ ॥
भागीरथी गोदावरी । केली कृष्णा आणि कावेरी ३
राम अयोध्येचा पती । केली कृष्णा द्वारावती ॥४॥
बद्रीओढ्या जगन्नाथ । केला स्वामी निर्मळनाथ ॥५॥
मातापूर तुळजापूर । सप्तशृंगी कोल्हापूर ॥ ६ ॥
केली पंढरी नरहरी । शंभु पाहिला शिखरीं ॥ ७ ॥
सिद्ध भैराळ मारुती । देव केले नेणो किती ॥ ८ ॥
बारा लिंगें या वेगळीं । तीर्थें केलीं भूमंडळीं ॥ ९ ॥
दास म्हणे भावें[6] । तरी हें मन पालटावें ॥ १० ॥

---

१ हेतु २ अंतस्थ हेतु = कार्य ३ विवरण = स्पष्टीकरण करी ४ सर्व प्राण्यांना ५ सहन करतो ६ भावयुक्त मनानें, भक्तीनें.

## विवेक-वैराग्य.

(१) कामक्रोध आवरावे । मदमत्सर तुटावें ॥ १ ॥
सांडोनियां कुलक्षणें । शुद्ध धरावी लक्षणें ॥ २ ॥
लोभदंभासी तुटावें । मीपणासी आटपावें ॥ ३ ॥
विवेक-वैराग्य विश्वास । धरणें म्हणे रामदास ॥ ४ ॥
(२) हो कां मुमुक्षु[1] अथवा मुक्त । आहे विशेष आसक्त ॥
विवेक-वैराग्य-संग्रह । करणें लागे यावद्देह[2] ॥ २ ॥
रामीं रामदास म्हणे । शांति ज्याच्या दृढपणें ॥ ३ ॥

## भ्रम.

(१) छाया[3] देखोनी आपली । जीव झाला दिशाभुली ॥
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥
मुखें बोले उत्तर । तेथें झालें प्रत्युत्तर ॥ ३ ॥
डोळां घालितां आंगोळी[4] । एकाची ती दोन झाली ४
पोटीं[5] आपण कल्पिलें । तेंचि आलेंसें वाटलें ॥ ५ ॥
दास म्हणे हे उपाधि । शंका धरितां अधिक बाधी ६
(२) वाजे पाऊल आपुलें । म्हणे मागें कोण आलें १
कोण धांवतसे आड । पाहों जातां झालें झाड ॥२॥

---

१ मोक्षाची इच्छा करणारा  २ जीव असेपर्यंत  ३ सावली
४ बोट  ५ अंतःकरणांत.

भावीतसे[1] अभ्यंतरीं[2] । कोण आलें बरोबरी ॥ ३ ॥
शद्ब पडसाद[3] ऊठला । ह्मणे कोण रे बोलिला ॥ ४ ॥
रामीं रामदास ह्मणे । ऐशीं शंकेचीं लक्षणें ॥ ५ ॥

## नर-देहाचें सार्थक.

(१) पक्षी श्वापद[4] किडा मुंगी । पराधीन जिणें[5] जगीं १
तैसा नव्हे हा नरदेहो । करी भक्तिचा लवलाहो ॥२॥
नीच योनी[6] चारी खाणी । अवघे पराधीन प्राणी ॥३॥
रामी रामदास म्हणे । ज्ञान ध्यान पशु नेणें ॥ ४ ॥
(२) पाप पुण्य समता[7] घडे । तरिच नरदेह आतुडे[8] १
याचें सार्थक करावें । आपणासी उद्धरावें ॥ २ ॥
बहु जन्माचे शेवटीं । नरदेह पुण्यकोटी ॥ ३ ॥
रामदास ह्मणे आतां । पुढती न लागे मागुता ॥ ४ ॥
(३). देश काळ वर्तमान । असे अवघाचि अनुमान ॥१॥
भक्ति करावी देवाची । घडी[10] जातसे सोन्याची ॥२॥
काळ[11] वेळची पाहतो । सदा सन्निधची[12] राहतो ॥३॥
रामी रामदास म्हणे । देह आहे जाईजणें[13] ॥ ४ ॥

---

१ कल्पना करीत असे २ मनांत ३ पडशद्ब ४ हिंस्र जनावरें ५ जगणे ६ छंद ७ जन्म ८ सारखे ९ मिळे १० घटका ११ यम १२ जवळ १३ क्षणभंगुर-जाणारा.

## देव व भक्त.

(१) देव म्हणे मी जात नाहीं । आतां चिंता न करी कांहीं ॥
मज पाहावा संतापाशीं । सेविं जाणत्या भक्तांसीं ॥२॥
मज जाणावा विचारें । सगुणाच्या भजनद्वारें ॥ ३ ॥
देव म्हणे दासासी । रे मी आहे तुजपाशीं ॥ ४ ॥
(२) माझी ब्रीदें[1] कां विसरतां । आणि व्यर्थ कां चिष्टतां १
भक्त-वत्सल दीनानाथ । तुम्हा आधार समर्थ ॥ २ ॥
भय दाखवी अनिवारी । तोचि सर्व चिंता करी ॥३॥
दासासमीप राहतो । योगक्षेम[3] हीं वाहतो ॥ ४ ॥
(३) मज गांजिले तें साहे[4] । परि भक्तांचे न साहे ॥१ ॥
माझ्या भक्ता शीण[5] व्हावा । मग मजसी त्यासीं घावा ॥
मज अवतार घेणें । माझ्या भक्ताचे कारणें ॥ ३ ॥
निज दासांसी पाळावें । दुर्जनासी निर्दाळावें[6] ॥ ४ ॥
(४) आतां बोलावें तें किती । मनीं पहावी प्रचीती ॥१॥
तुह्मां संकटाचे वेळे । काय झांकितों मी डोळे ॥२॥
सेवकांचा अभिमान । समर्थाचें हें लक्षण ॥ ३ ॥
ह्मणे दास जनीं । चिंता न धरावी मनीं ॥ ४ ॥

---

१ प्रतिज्ञा २ पुष्कळ ३ पोटाची व्यवस्था ४ सोसते ५ श्रम ६ मारावे.

(५) रे मी भक्तांचा कोंवसा[1] । मनीं धरावा भरंवसा ॥१॥
समर्थांचिया सेवका । काय करवेल रंका ॥ २ ॥
कोप येतांचि ते घडी । घेईन काळाची नरडी[2] ॥३ ॥
दासा सांभाळावें सदा । मज आणिक नाहीं धंदा ४

(६)भक्ता लागीं पावे नेटें[3] । वारी[4] भक्तांचीं संकटें ॥१॥
देव भावें लांचावला[5] । त्यासि अभिमान लागला ॥२॥
आपुल्या भक्ताचें जें उणें । साहेना[6] तें कोटीगुणें ॥३॥
दास म्हणे नानापरी । देव भक्ताचा कैवारी ॥ ४ ॥

## ज्ञान.

(१) आम्ही समाधान गावें । तुम्हीं सावध ऐकावें ॥ १ ॥
सकळ सृष्टीचा गासावी । त्याचा अ.ळख पुसावी ॥२॥
स्वयें बोलिला सर्वज्ञु[7] । ज्ञानविण सर्व पशु ॥ ३ ॥
दास म्हणे नाहीं ज्ञान । तया नर्की पतन ॥ ४ ॥

(२ । ज्ञानेंवीण जी जी कळा । ती ती जाणावी अवकळा॥
ऐसें भगवंत बोलिला । चित्त द्यावें त्याच्या बोला ॥२॥
एक ज्ञानचि साथेक । सर्व कर्म निरर्थक ॥ ३ ॥
दास म्हणे ज्ञानेंविण । प्राणी जन्मला पाषाण ॥ ४ ॥

---

१ आधार २ काळाचा [ यमाच्या ] नरडाचा घोट घेईन ३ लागलाच ४ दूर करी ५ लुब्ध झाला ६ सहन करीना ७ सर्वज्ञ-परमेश्वर.

(३) पांच लक्षणीं पुरता । धन्य धन्य तोचि ज्ञाता ॥१॥
विवेक-वैराग्य सोडीना । कर्म-मर्यादा सांडीना ॥ २ ॥
बाह्य झालें शब्दज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ ३ ॥
रामी रामदास कवी । न्याय नीतीनें शिकवी ॥ ४ ॥
(४) अंतर्यामीं समाधान । बाह्य सगुण भजन ॥ १ ॥
धन्य धन्य तेंचि ज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ १ ॥
निरूपणें अंतस्त्याग । बाह्य संपादी वैराग्य ॥ ३ ॥
रामी रामदास ह्मणे । ज्ञान स्वधर्म लक्षणें ॥ ४ ॥

# भाग ४ था.

## विविध श्लोक.

ह्मणे दास लोकांसि मीं काय सांगो ।
तराया जनीं मीच कांसेस[1] लागो ॥
बरीं साक्षेपें[2] औषधें मेळवावी ।
जया लागला रोग तेणेंचि घ्यावी ॥ १ ॥
असे अर्थ तें, सार्थकें[3] धन्य होतें ।
नसे अर्थ तें बोलणें व्यर्थ जातें ॥
कणेंविण[4] काबाड[5] तें व्यर्थ जाणा ।
बरें शोधितां ही नसे एक दाणा ॥ २ ॥
नुठे[6] घोष[7] ज्या मंदिरीं[8] राम-नामें ।
जळो संपदा, जाळि तें हेमधामें[9] ॥
जळो बोल ते फोल वाचाळ ज्ञानी ।
नसे मानसीं राम कैवल्यदानी[10] ॥ ३ ॥

---

१ ( श्रीरामाच्या ) आश्रयास २ प्रयासानें ३ अर्थ आहे म्हणून ४ कण = दाणा ५ कडवा ६ उठत-होत-नाहीं ७ गर्जना ८ घरीं ९ सोन्यांचीं घरें १० मोक्षदेणारा.

करावी हरी-भक्ति तें पर्व-काळीं[1] ।
यथासांग रे अन्न खावें सुकाळीं[2] ॥
बरा काळ कांहीं अखंडीत[3] नाहीं ।
बहु लोक गेले विचारूनि पाहीं ॥ ४ ॥
करें[4] पूजन राघवाचें करावें ।
पदें[5] राघवा-आश्रमासींच जावें ॥
बरें कर्ण-वीळीं[6] कथे आयकावें ।
सदा सर्वदा साधुसंगीं बसावें ॥ ५ ॥
घरें सुंदरें मंदिरें रम्यदारा ।
झणीं[7] आपली मानिसी रे गव्हारा[8] ॥
जिवा जन्मतां निर्मिलें तें टळेना ।
क्षणा काय होईल ऐसें कळेना ॥ ६ ॥
चिंता चिंता व्यर्थ चिंता करीतां ।
किंता[9] किंता वाय किंता धरीतां ॥
सीता-कांता सेवकाची अहंता[11] ।
दाता दाता राम हा सौख्य-दाता ॥ ७ ॥

---

१ पुण्यकाळीं २ योग्यवेळीं ३ एकसारखा ४ हातानें ५ पायानें ६ कर्ण-रंध्रानें, कानानें ७ व्यर्थ ! ८ मूर्खा ९ किंतु-संशय १० व्यर्थ. ११ अभिमान

जळो भाग्य-वैराग्य हें शीघ्रकोपी ।
जळो ज्ञान-विज्ञान हे लोभरूपी ॥
जळो भक्ति वीभक्ति[1] जेथें सुटेना ।
जळो व्युत्पत्ती[2] वाद जेथें तुटेना ॥ ८ ॥
तुला नेणतां[3] जन्मलों आणि मेलों ।
किती वेळ मी सर्व-सृष्टीच झालों ॥
तुला जाणतां तूंचि होऊन गेलों ।
विचारें कृपा-सागरं मुक्त केलों ॥ ९ ॥
निंदूनि सिंधू[4] बुडसी तळाथीं[5] ।
त्यजूनि सोनें धरिशील माती ॥
ऐसा प्रपंचीं भुललासि कामा ।
सांडूनि रामा फिरसी रिकामा ॥ १० ॥
बहू पाप होतांचि दारिद्र्य येतें ।
बहू पुण्य होतांचि तें भाग्य येतें ॥
बरें कोण मानेल तसें करावें ।
मनीं थोर पाहोन हातीं धरावें ॥ ११ ॥
वसे न्याय तेथें भल्यानें असावें ।
नसे न्याय तेथें कदा ही नसावें ॥

---

१ वेगळेपणा २ विद्वता ३ न जाणतां ४ समुद्र ५ तळहाताएवढ्या पाण्यांत-डबक्यांत.

प्रमाणांतरें[1] चित्त तें हीं न घाली ।
तया पापरूप्यासी[2] कां रांड व्याली ॥ १२ ॥
सदा तेल आणा सदा मीठ आणा ।
सदा धान्य आणा सदा द्रव्य आणा ॥
सदा वस्त्र आणा सदा शाख[5] आणा ।
सदा सर्वदा सर्व आणाच्चि आणा ॥ १३ ॥
सदा मागतां दास देवा न साहे[6] ।
न मागे तयाची रमा[7] दासि होये ॥
असे आस[8] तो दास झाला जगाचा ।
नसे आस तो ईशु[9] ब्रह्मादिकाचा ॥ १४ ॥
तारुण्य-लावण्य[10]-संपन्न[11] नारी ।
[12]कौशल्यतावैभव चित्तहारी ॥
एकांत काळीं पडतां संबंधू ।
अभिलाष[13] न धरी तो धन्य साधू ॥ १५ ॥
जया यत्न फावेल तेणें करावा ।
महोत्सव या राघवाचा करावा ॥

---

१ प्रमाणयुक्त ( वाचनांत ) २ चांडाळास ३ रंडकी-हतभागी स्त्री ४ प्रसवली ५ भाजी ६ सहन होत नाहीं-आवडत नाहीं. ७ लक्ष्मी ८ आशा ९ मालक १० सौंदर्य ११ युक्त १२ चातुर्य १३ इच्छा.

महायत्न देखोनियां काळ[1] धाके[2] ।
प्रतापें बळें गाजवावे तडाखे ॥ १६ ॥
विषयविष वमावें[3], कल्पनेला दमावें[4] ।
निजपद निजभावें दृढ चित्तीं धरावें ॥
भवभय[5] निरसावें[6], साधुसंगीं वसावें[7] ।
सगुणभजन द्यावें, स्वामिदेवाधिदेवें ॥ १७ ॥
जन वमनपरी[8] तूं टाकि थुंकून चित्ता ।
वन विजन[9] धरी तूं ज्ञानवैराग्यवंता ॥
विसर सकळ दुःखें, पावती शांति रामीं ।
पहुडसि[10] सुखशेजे[11], सर्व कल्याणधामीं[12] ॥ १८ ॥
करकर न करावी, प्रीति रामीं धरावी ।
गरगर फिरवी ते वासना नीरसावी ॥
हरिहर म्हणतां तो देव तत्काळ पावे ।
अति विमळ पवाडे[13] मानसीं आठवावे ॥ १९ ॥
सहज पडत आहे तैसतैसें करावें ।
अनुकुल पडताहे तेथतेथें फिरावें ॥

---

१ काळ २ भितो ३ ओकावें-टाकावें ४ दाबून ठेवावें ५ संसाराची भीति ६ नाहींसें करावें ७ राहावें ८ ओकाप्रमाणें ९ निर्जन-मनुष्यरहित १० निजसी ११ सुख-शय्येवर १२ कल्याण मंदिरीं १३ वर्णन ( कवितावद्ध )

अवचट[1] घडतें तें सज्ज होऊन येतें ।
खटपट करणें तें शेवटीं व्यर्थ जातें ॥ २० ॥
रतिमद[2] पळ पाहे, पाप कल्पांत राहे ।
सुख लघुतर आहे, दुःख अंतीं न साहे ॥
त्यजि[3] परवनितेचा लोभ हा अंतरींचा ।
यजि[4] पति जगतीचा[5] नाथ योध्यापुरीचा[6] २१
चित्ता चातक होउनी रघुपती ध्यायें सदा सर्वदा ।
दाता एक सितापतीविण मुखीं आणीक नेणे कदा ॥
निंदा वाद प्रपंच खेद न करी, भेदासि दे आपदा ।
क्षांती[7] शांति धरी, दया भुतिं[8] करी, तेणें चुके आपदा ॥
बहुत सार[9] विचार करी मना ।
दृढ धरीं रघुनाथउपासना ॥
रघुविरा भजतांचि सुखावसी ।
परम सुंदर तें पद पावसी ॥ २३ ॥
कांता, कांचन[10], पुत्र, मित्र, दुहिता, जामात, माता, पिता ।
बंधू, इतर पीशुनें[11] बहुजनें संख्या नसे मोजितां ॥

---

१ एकदम २ संभोग-सुख ३ टाक ४ पूजा कर ५ जगाचा ६ अयोध्या नगरीचा ७ क्षमा ८ प्राण्यावर ९ श्रेष्ठ १० सोनें ११ दुष्ट लोक.

देहांतीं सकळैक मायिक, नरा सोडून येती घरा ।
तेथें सोडविता नसे रघुविरावांचुनिया दूसरा ॥२४॥

मनासारिखी सुंदरा ते अनन्या[1] ।
मनासारिखे पुत्र जामात कन्या ॥
सदा सर्वदा बोलती रम्य वाचा ।
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा[2] ॥ २५ ॥

संसारमाया ममता नसावी ।
नैराशता[3] दुर्लभ ते असावी ॥
आनंदरूपीं भजनीं भरावें ।
निरूपणें[4] मानस आवरावें ॥ २६ ॥

ब्रह्मादिका मानस आवरेना ।
नाना उपायीं मरतां मरेना ॥
तें निर्गुणीं पांगुळतां[5] मरावें ।
निरूपणें मानस आवरावें ॥ २७ ॥

जनीं मनावांचुनि सूख नाहीं ।
मनेंचि लाभे गुज[6] सर्व कांहीं ॥
परंतु तें स्वाधिन हो करावें ।
निरूपणें मानस आवरावें ॥ २८ ॥

---

१ एकनिष्ठ २ पुण्याचा ३ निरिच्छपणा ४ निर्गुणचर्चेनें
५ पांगुळ होतांना ६ गुह्य.

जया मानवा लागला हाचि धंदा ।
सदा सर्वदा मानसीं साधुनिंदा ॥
सळें[1] मत्सरें येति वादा विवादा ॥
तया जाणत्या लागली थोर बाधा ॥ २९ ॥
जना दुर्जनाचा नको संग रामा ।
जनीं वृत्ति हे पावताहे विरामा[2] ॥
सदा सर्वदा संग दे सज्जनासी ।
जनीं नित्य आनंद वाटे मनासी ॥ ३० ॥
भला तोचि जो मुख्य आचार राखे ।
गुरू देव लौकीक वेदासि राखे ॥
करूं ये बरें जें असें तो करीतो ।
महावाक्य[3] तत्वादिकें वीवरीतो[4] ॥ ३१ ॥
नव्हे बोध जो मत्त उन्मत्त व्हावें ।
नव्हे बोध जो साधका भ्रष्टवावें ॥
नव्हे बोध जो निंद्य चोरूनि खावें ।
नव्हे बोध जो ज्ञानगर्वें बुडावें ॥ ३२ ॥
अती दुष्करें क्लेश कीजेत देहीं ।
तथापी तरी वाषयो प्राप्त नाहीं ॥

---

१ जोरा  २ [illegible] ३ [illegible] चार प्रसिद्ध वाक्यें
४ विवरण  [illegible]

कदापी जरी लाहिजे[1] प्राप्ति याची ।
तरी इंद्रियामाजि संतृप्ति[2] कैंची ॥ २३ ॥
तिहीं लोकिच्च्या सुंदरा व्यक्ति[3]मात्रा ।
जरी दाविल्या एक वेळेचि नेत्रा ॥
तरी तृप्ति नाहीं शिखा वाढताहे ।
जसा इंधनें दिक्पती[4] दीप्त होये ॥ २४ ॥
जगीं शाहणे तेचि तारुण्यकाळीं ।
करीना कदा वीषयांची धुमाळी[5] ॥
जगीं शाहणे जे अहंभाव जाळी ।
सदा सर्वदा मानसीं चंद्रमौळी ॥ २५ ॥
जगीं शाहणे ते कसे ओळखावे ।
भजे शंकरालागि आनन्यभावें[6] ॥
ह्मणेना कदा आपुलें कीं परावें[7] ।
दया सर्व भूतीं जयाची स्वभावें ॥ २६ ॥
शिकेना तरी त्यास कांहींच येना ।
शिके तो गुणाला कदा जाउं देना ॥
गुणें श्रेष्ठ तो श्रेष्ठसा ओळखावा ।
गुणेंविण तो हीन[8] जाणोन घ्यावा ॥ २७ ॥

---

१ मिळेल २ समाधान ३ सर्वव्यक्ति×ज्वाला ४ दिशेचा पति-अग्नि ५ गर्दी ६ अनन्यभावें-एकनिष्ठतेनें ७ दुसऱ्याचें ८ कनिष्ट.

फळें तोय सांडूनिया थोरथोरी ।
गिरी-कंदरीं[२] राहिजे निर्विकारी ॥
तया ऐशिया काम[३] बाधून गेला ।
धरे धीर कैसा तया मानवाला ॥ ३८ ॥
सदन्नें[४] वरीं सद्य[५] नानापरीचीं ।
रसाळें[६] रसामाजि जे कूसरीचीं[७] ॥
जनीं भोजनीं जो मनीं तृप्त होतो ।
तया काम तो नष्ट कैसा रहातो ॥ ३९ ॥
अद्वैतचर्चा गुरुगम्य[८] आहे ।
कळे ह्मणे तो सहसा न साहे ॥
चोरूनि जागे हृदयीं अहंता ।
कळे ह्मणे त्या न कळेचि भ्रांता ॥ ४० ॥

---

१ पाणी २ पर्वताच्या गुहेंत ३ मदन ४ चांगलीं अन्नें ५ तत्काळ ६ रसयुक्त, गोड ७ कुशलतेनें केलेलीं ८ गुरुमुखानेंच समजण्यास योग्य.

# भाग ५ वा.

## विविध स्फुट.

(१) यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेवीण दरिद्रता ।
उमजला लोक तो धाला[1] । उमजेना तो हपापिला[2] ॥१॥
घरींच बैसतां खोटें । ब्राह्मणू हिंडतां बरा ।
आळसी घातघेणा[3] तो । कष्टला ह्मणिजे बरा ॥ २ ॥
समयीं धीर सांडीना । यत्नीं यत्न बरा करी ।
हिंडतां पारखी[4] लोका । कार्यकर्ता जिवीं धरीं ॥ ३ ॥
मैत्रिकी ही विटो[5] नेदी । सर्वांसी सारखा दिसे ।
विचार जाणतो मोठा । दक्ष तो जाणता जनीं ॥ ४ ॥
करावें तेंचि पावावें । हें आलें आपणाकडे ।
आपले आपणापासी । जनासी काय बोल हा ॥ ५ ॥
वेषानें[6] कार्य साधेना । विवेकें कार्य साधतें ।
विवेकी मानिती ज्याला । धन्य तो ब्राह्मणू जनीं ॥ ६ ॥
एके स्थळीं स्थिरावेना । नित्य नूतन साजिरा ।
कीर्ति ते दिगंतीं[7] धांवें । नेमस्त राहतां जनीं ॥ ७ ॥

---

१ समाधान पावला २ हावरा झाला ३ घातकी ४ परीक्षा करी ५ मळीण होवों ६ पोषाखानें ७ दूरदेशीं.

स्नानसंध्या टिळेमाळा । उदास तापसी फिरे ।
उत्तमू तो नेय वाट्या । जेथें तेथें विराजतो ॥ ८ ॥
(२) भाग्यासी काय ऊणें रे । यत्नावांचूनि राहिले ।
यत्न तो करावा कैसा । हेंचि आधि कळेचिना ॥ १ ॥
मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणें बरें ।
चालणें सत्य नेमाचें[1] । नीति न्याय चुको नये ॥ २ ॥
सांगोंचि जाणती सर्वे । कर्ता कोणी दिसेचिना ।
जाणते नेणते सांगो । स्वभाव लागला जनीं ॥ ३ ॥
करंटे मिळाले सर्वे । जो तो बुद्धीच[2] सांगतो ।
सांगावें तें आपणाला । आपणू करितां बरें ॥ ४ ॥
(३) प्रसंगमान जाणावें । बाणावें बहुतांपरी ।
भक्तिभाव असो द्यावा । घालावा भार ईश्वरीं ॥ ५ ॥
सर्वत्र लोक शोधावे । बोधावें भक्तिच्या गुणें ।
राहावें दुर्बळाचेथें[4] । देवाल्यें[5] वा नदीतिरीं ॥ ६ ॥
अत्यंत साक्षपी व्हावें । न व्हावें आळशी कदा ।
घ्यावा या देहाचा लाहो[6] । जायाचें[7] हें म्हणोनिया ॥ ७ ॥
मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते ।

---

१ नियमित, नेमस्त  २ बुद्धिवाद, उपदेश  ३ काळ, वेळ
४ दुर्बळाचें येथें ५ देवाल्य – देवालय ६ छंद ७ नश्वर.

धन्यधन्य म्हणे लोक । सत्क्रिया करितां बरी ॥ ८ ॥
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा । लावावी धर्मवासना ।
देवाल्यें करावी मोठी । वापी[1] कूप[1] सरोवरें ॥ ९ ॥
सावधू सकळा ठायीं । न्याय नीति चळो नयो ।
सकळांसी सख्य राखावें । वर्तावें तें मनोगतें ॥ १० ॥
(४) स्वतंत्र ईश्वरू जाणा । पराधीनचि मानवी[2] ।
विषय वासनेसाठीं । पराधीनचि जाहले ॥ १ ॥
ज्ञान तो जाणिजे देवो । ज्ञानें परत्र[3] पावणें ।
प्रवृत्ति—निवृत्ति—ज्ञानें । ज्ञानें मोक्षचि पाविजे ॥२॥
देव तो दयाळू मोठा । अन्याय क्षमणें बहू ।
भक्तांचा साभिमानी[4] तो । बुद्धिदाता परोपरी ॥३॥
भक्तांला काय उणे रे । देव त्रैलोक्य चालवी ।
तो देव आपुला झाला । वैभवा कोण पूसतें[5] ॥४॥
भक्त तो घेइना कांहीं । देवें त्रैलोक्य दीधलें[6] ।
सर्वही सांडिलें दोघीं । एकमेकांसि लाविती ॥ ५ ॥
भक्तानें अंतरीं देवो । जाणोनी धरिला बळें ।
देव ही विसंभेना[7] कीं । सोडीना भक्त-वत्सल ॥ ६ ॥

---

१ विहीर २ मनुष्य ३ परलोक ४ अभिमानी ५. विचारतें ६ दिलें ७ विसरेना.

भक्तांचें न्यून[1] सोशीना । न्यून तें पुरतें करी ।
भक्तांचा भारवाही[2] तो । ब्रीदें[3] ची चालिलीं असे ॥७॥
रामदास म्हणे माझा । रामस्वामी दयानिधी ।
सोडिलें बंध देवाचे । तो हा त्रैलोक्यनायकू[4] ॥८॥

(५) माझें माझें तुझें माझें । ऐसी हे मैत्रिकी जनीं ।
माझें तुझें तुझें तूझें । ऐसें हें न घडे कदा ॥ १ ॥
आशेची मैत्रिकी खोटी । दुराशा विटंबी[5] पुढें ।
परोपकारिणी मैत्री । ते मैत्री न विटे[6] कदा ॥ २ ॥
अविश्वासें वस्ति केली । विश्वास हृदयीं नसे ।
विकल्पें[7] चालते मैत्री । ती मैत्री आत्मघातकी ॥४॥
मित्र तो पाहिजे ज्ञानी । विवेकी जाणता भला ।
श्लाघ्यता पाहिजे तेथें । इहलोक परत्र ही ॥ ५ ॥
संगदोषें महादुःखें । संगदोषें दरिद्रता ।
सत्संगें महद्भाग्य । प्राणी प्रत्यक्ष पावती ॥ ६ ॥
संग तो श्रेष्ठ जाणावा । नीच संग कामा नये ।
न्यायवंत गुणग्राही । यत्नाचा संग तो बरा ॥ ७ ॥

(६) देहाचा भर्वसा नाहीं । तारुण्य चळते जनीं ।

---

१ कमीपणा २ ओझें वाहणारा-सहायक ३ ब्रीद-व्रत-प्रतिज्ञा ४ पति, नाथ ५ नाश करी ६ मंद होत नाहीं ७ संशयानें

वृद्धापीं विटंबे काया । रूप विद्रूप[1] होतसे ॥ १ ॥
दुरूनि ऐकिजे कानीं । ते कर्ण बधिरावले ।
दुरूनि न्याहळे[2] डोळां । ते डोळे मंद जाहले ॥ २ ॥
नासिकें गळतें पाणी । जिव्हेची बोबडी वळे ।
हात ते सर्वही गेले । मान हाले निरंतरीं ॥ ३ ॥
उदंड पाहिली पृथ्वी । उंबरा उंच जाहला ।
पाळिलीं पोसिलीं होतीं । हांसती तेचि माणसें ॥ ४ ॥
मागील आठवे सर्वे । दुःख वाटे क्षण क्षणा ।
आक्रंद[3] तो करी कुंथे । आयुष्य न सरे कदा ॥५ ॥
सर्व एकीकडे जाती । हांसती खेळती सुखें ।
पाहतां न येती कोणी । आपला त्या कामाकडे ॥६॥
ऐसें हें दुःख वृद्धापीं । कळलें पाहिजे जना ।
परम[4] साधणें आधीं । तारुणींच उठाउठी[5] ॥ ७ ॥

(७) चुकतां होतसें वांखो[6] । न चुकतां बहू बरें ।
अभ्यासें चूक सांडावी । अचूक मान्य होतसें ॥ १ ॥
चाळणा[7] कळावी सर्वे । एकांतीं राहतां बरें ।
एकांत मानला ज्याला । त्याला साधें हळूहळू ॥ २ ॥

---

१ कुरूप २ दिसत होते ३ ओरडे ४ परलोक ५ एकदम ६ घोटाळा. ७ विचार

उत्तमू प्रत्यय-ज्ञानी[1] । मध्यमू शास्त्र-निश्चयी ।
अधमू लोकधारीचा[2] । पाषांडो अधमोधमू ॥ ३ ॥
धन्य तो सर्वहीं जाणे । सार शोधूनि घेतसे ।
प्रयत्नेंवीण मानीना । तो ज्ञाता दुर्लभू जनीं ॥ ४ ॥
(८) वन्ही तो चेतवावा[3] रे । चेतवीताचि चेततो ।
विवेक जाणिजे तैसा । वाढवीतांच वाढतो ॥ १ ॥
संग तो साक्षपीयांचा[4] । धरितां साक्षपू घडे ।
साक्षपें साक्षपू वाढ । पुरती मन कामना ॥ २ ॥
कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळचि पाविजे ।
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ॥ ३ ॥
केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ ४ ॥
अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ।
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ॥ ५ ॥
सावधू देव जाणावा । उन्मत्त[5] दैत्य बोलिजे ।
होरट्या[6] दैत्य जाणावा । देव तो सौख्यदायकू ॥ ६ ॥
साक्षपी अंश देवाचे । आळशी वंश दानवी ।
राक्षसी दैत्य तो मोठा । अन्यायें दैत्य जाहला ॥ ७ ॥

---

१ अनुभव-ज्ञानी २ लोकप्रवाहाप्रमाणें वागणारा ३ पेटवावा ४ उद्योगी लोकांचा ५ गैरसावध ६ हट्टी

उत्तमू प्रत्यय-ज्ञानी[1] । मध्यमू शास्त्र-निश्चयी ।
अधमू लोकधारीचा[2] । पाषांडो अधमोधमू ॥ ३ ॥
धन्य तो सर्वही जाणे । सार शोधूनि घेतसे ।
प्रयत्नेंवीण मानीना । तो ज्ञाता दुर्लभू जनीं ॥ ४ ॥
(८) वन्ही तो चेतवावा[3] रे । चेतवीताचि चेततो ।
विवेक जाणिजे तैसा । वाढवीतांच वाढतो ॥ १ ॥
संग तो साक्षपीयांचा[4] । धरितां साक्षपू घडे ।
साक्षपें साक्षपू वाढ । पुरती मन कामना ॥ २ ॥
कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळचि पाविजे ।
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ॥ ३ ॥
केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ ४ ॥
अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ।
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ॥ ५ ॥
सावधू देव जाणावा । उन्मत्त[5] दैत्य बोलिजे ।
होरट्या[6] दैत्य जाणावा । देव तो सौख्यदायकू ॥ ६ ॥
साक्षपी अंश देवाचे । आळशी वंश दानवी ।
राक्षसी दैत्य तो मोठा । अन्यायें दैत्य जाहला ॥ ७ ॥

---

१ अनुभव-ज्ञानी  २ लोकप्रवाहाबाप्रमाणें वागणारा  ३ पेटवावा  ४ उद्योगी लोकांचा  ५ गैरसावध  ६ हट्टी

(९) प्रपंच नेणता वेडा । जाणता देव बोलिजे ।
चतुर इतरां वाटे । ज्ञानी तो सर्व तो दुर्लभू ॥ १ ॥
लोक हे राखतां राजी । सर्व राजीच होतसे ।
अंतरें चूकतां तेथें । सर्व भाजीच[१] होतसे ॥ २ ॥
जन हे वोळती[२] जेथें । अंतरात्माच वोळला ।
जन हे खौळले[३] जेथें । अंतरात्माच खौळला ॥ ३ ॥
करावें आपणासाठीं । बरें वाईट वोखटें ।
करावें तेंचि पावावें । द्यावें घ्यावेंचि ऊसणें ॥ ४ ॥
बऱ्यानें बरवें होतें । दुःखें दुःखचि वाढतें ।
सर्व हें आपणापासीं । लोकांसी म्हणतां नये ॥ ५ ॥
घरीचीं माणसें राजी । राखावीं तीं परोपरी ।
भंगलें[४] चित्त जाणावें । रक्षावें तें परोपरी ॥ ६ ॥
अंतरीं प्रीति राखावी । शब्दाशब्दीं परोपरी ।
तूटली प्रीति ते खोटी । रक्षिली पाहिजे बरी ॥ ७ ॥
वर्तता यत नाहीं रे । वर्तणें न कळे जनीं ।
सकळासी राखणें राजी । हें मुख्य भक्ति जाणिजे ८
(१०) जाणता लोक भाग्याचा । नेणता दरिद्री सदा ।
दरिद्री आळसी मोठा । भाग्याचा यत्न वाढवी ॥१॥

---

१ घोंटाळा २ संतुष्ट होतात ३ खवळले रागावले ४ दुखवले.

बुद्धीचें गुंथाडे[१] मोठें । दक्ष धूर्तचि जाणती ।
जाणोनि कार्य होतें रे । वर्तणें खस्त  पाहिजे ॥२॥
लोक हे लालची[३] मोठे । गफ्लती[४] होतसे सदा ।
भाग्य हें चूकतां जातें । आळसें काम नासतें ॥३॥
अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा ।
उदंड बोलणें लागे । यथातथ्य हळूहळू ॥ ४ ॥
सर्वही पेरणें विद्या । लोकांमध्यें हळूहळू ।
नेणतें[५] जाणते करणें । कथानिरूपणें सदा ॥ ५ ॥
कंटाळा दुरि टाकावा । मनामध्यें त्रासों नये ।
सांगतां सांगतां हांसे । हांसे खेळे अहर्निशीं ॥ ६ ॥
विवेकी दक्ष जो कोणी । पुरुषार्थू धर्मरक्षकू ।
अमोल्य जन्म हा तेणें । व्यर्थची दवडूं नये ॥ ७ ॥
संसारीं दोनि साधावी । इहलोक परलही ।
इहलोक साधिती सर्वै । शक्त्यनुसार घरोघरीं ॥ ८ ॥

---

१ गोंधळ   २ कडक–नियमानुसार   ३ लोभी   ४ लबाडी
५ अज्ञानाला ज्ञानी करणें.

# भाग ६ वा.

## विविध स्फुट-ओव्या.

(१) संसार करितां ह्मणती हा दोषी ।
न करितां आळशी पोटपोसा[1] ॥ १ ॥
ऐसा हा लौकिक कदा राखवेना ।
पतित-पावना देवराया ॥ २ ॥
भक्ति करूं जातां म्हणती हा पसारा ।
न करितां नरा निंदिताती ॥ ३ ॥
आचारें असतां ह्मणती नाक धरी ।
येर[2] अनाचारी पापरूप ॥ ४ ॥
सत्संग धरीतां ह्मणती उपदेशी ।
येर अभाग्यासी ज्ञान कैंचें ॥ ५ ।
अभाग्यासी, ह्मणती ठायींचा करंटा ।
समर्थासी, ताठा लावीतसे ॥ ६ ॥
बहु बोले जातां ह्मणती हा वाचाळ[3] ।
न बोलतां सकळ गर्वी म्हणती ॥ ७ ॥
भेटीस न जातां ह्मणती हा निष्ठूर[4] ।

---

१ उदरंभरू-पोटभऱ्या २ दुसरें-उलट वागणारें ३ बडबड्या
४ क्रूर, दयाहीन.

जातां ह्मणती घर बूडविलें ॥ ८ ॥
धर्म[1] न करितां ह्मणती हा सांचीतो[2] ।
करितां काढितो दिवाळें कीं ॥ ९ ॥
लग्न करूं जातां म्हणती हा मातला[3] ।
न करितां झाला नपुंसक ॥ १० ॥
निपुत्रिका म्हणती पहा हा चांडाळ ।
पातकाचें फळ पोरवडा[4] ॥ ११ ॥
लोक जैसा ओक[5] धरीतां धरेना ।
अभक्ती सरेना अंतरींची[6] ॥ १२ ॥
दास ह्मणे मज तुझाची आधार ।
दुस्तर[7] संसार तरिजेल ॥ १३ ॥
(२) शौच केला तेणें शुचिर्भूत झाला ।
जलस्नानें गेला मळत्याग ॥ १ ॥
मळ-त्यागें झालें शरीर निर्मळ ।
अंतरींचा[8] मळ कैसा जातो ॥ २ ॥
कैसा जातो काम लोभ आणि दंभ[9] ।
नांदती स्वयंभू अंतर्यामीं ॥ ३ ॥

---

१ दानधर्म २ सांठवितो ३ उन्मत्त झाला. ४ पोरांचा सुळसुळाट ५ वमन ६ मनांतील ७ तरून जाण्यास कठीण ८ मनांतील ९ अहंकार.

अंतर्यामीं आधीं होईजे निर्मळ ।
तेणें तुटें मूळ संसाराचें ॥ ४ ॥
निष्ठावंत ज्ञान पूर्ण समाधान ।
मग संध्यास्नान सफळीत ॥ ५ ॥
वरपंगे[1] देव कदा सांपडेना ।
निष्ठेचा घडेना भक्तिभाव ॥ ६ ॥
निरर्थक तीर्थं निरर्थक व्रतें ।
दास म्हणे जेथें ज्ञान नाहीं ॥ ७ ॥
(३) रावणासारखी कोणाची संपत्ती ।
तोहि गेला अंतीं एकलाची ॥ १ ॥
गेले चक्रवर्ती थोर वैभवाचे ।
फारा आयुष्याचे ऋषीश्वर ॥ २ ॥
ऋषीश्वर गेले मार्कंडासारिखे ।
इतरांचे लेखे[2] कोण करी ॥ ३ ॥
कौरव निमाले पांडव गळाले ।
यादवही गेले एकसरे[3] ॥ ४ ॥
एकसरा गेले राजे थोर थोर ।
आणीक श्रीधर[4] भाग्यवंत ॥ ५ ॥

---

१ वरवर उपचार २ गणना ३ एकदम. ४ लक्ष्मीवंत

भाग्यवंत गेले एकामागे एक ।
हरिश्चंद्रादीक पुण्यशील ॥ ६ ॥
पुण्यशील गेले कीर्ति ठेवूनिया ।
पापी गेले वाया अधोगती[1] ॥ ७ ॥
अधोगती[1] गेले देवां न भजतां ।
संसारीं असतां माझें माझें ॥ ८ ॥
माझें माझें करी साचाचिये[2] परी ।
शेखीं दुराचारी एकलाची ॥ ९ ॥
एकलाची येतां एकलाची जातां ।
मध्येंचि दुश्चिता मायाजाळीं ॥ १० ॥
मायाजाळीं पापी जन गुंडाळले ।
पुण्यशील गेले सुटोनियां ॥ ११ ॥
सुटोनियां गेले सायुज्य-पदासी ।
रामीं रामदासी चिरंजीव ॥ १२ ॥
(४) दुर्जनसंगती कदा धरूं नये ।
घडती अपाय[4] बहुविधा ॥ १ ॥
बहुविधा झाले अपाय बहुता ।
तेंचि सांगों आतां सावकाश ॥ २ ॥

---

१ वाईट गतीला २ खऱ्यासारखे ३ शेवटीं ४ संकटे.

कुसंग[1] हे माया धरीतां संगती ।
गेले अधोगती नेणो कीती ॥ ३ ॥
चांडाळ संगती होईजे चांडाळ ।
होय पुण्यशील साधुसंगें ॥ ४ ॥
दुर्जन संगती सज्जन ढासळे[2] ।
क्रोध हा प्रबळे अकस्मात ॥ ५ ॥
दास म्हणे संग त्यागा[3] दुर्जनाचा ।
धरा सज्जनाचा आदरेंसी ॥ ६ ॥
(५) पोट भरावया सांडिले उपास ।
झाला कासावीस लाभेवीण ॥ १ ॥
राजा पावावया प्रजा धुंडाळीतो ।
कासावसि होतो वाऊगाची ॥ २ ॥
द्रव्य साधावया निर्द्रव्याचा[4] संग ।
तेथें कैचें मग द्रव्य मिळे ॥ ३ ॥
ब्रह्म साधावया कर्मामागे गेला ।
तंव कर्मे केला कासावीस ॥ ४ ॥
सुटका व्हावया बंधनचि केलें ।
तेणें तें सूटलें केवी घडे ॥ ५ ॥

---

१ वाईट लोकांची संगति २ पडे-पतन होई ३ सोडा ४ गरीबाचा

कैंवी घडे दृढ रोगें आरोग्यता ।
कुपथ्यानें[१] व्यथा वाढतसे ॥ ६ ॥
एक व्यथा एक औषध घेतलें ।
दास म्हणे झाले तयापरी ॥ ७ ॥
(६) एकदां जेवीतां नव्हे समाधान ।
प्रतिदिनीं[२] अन्न खावें लागे ॥ १ ॥
तैसें निरूपण केलेंचि करावें ।
परी न करावें उदासीन ॥ २ ॥
प्रतिदिनीं अन्न प्रतिदिनीं जीवन[३] ।
देहसंरक्षण करावया ॥ ३ ॥
प्रत्यहीं संसारीं बोलावें लागतें ।
कांहीं केलिया तें सुटेना कीं ॥ ४ ॥
प्रत्यहीं हा देहो पहावा लागतो ।
शुद्ध करावा तो रातंदिवस ॥ ५ ॥
प्रत्यहीं देहानें भोगिलें भोगावें ।
त्यागिलें त्यागावें दास म्हणे ॥ ६ ॥
(७) कर्ता एक देव जेणें केलें सर्व ।
तयापाशीं गर्व कामा नये ॥ १ ॥

---

१ पथ्य मोडल्यानें २ दररोज ३ पाणी.

देह हें देवाचें वित्त कुबेराचें ।
तेथें या जीवाचें काय आहे ॥ २ ॥
देतां देववितां नेतां नेववितां ।
कर्ता करवितां जीव नव्हे ॥ ३ ॥
निमित्ताचा धणी केला असे प्राणी ।
पाहतां निर्वाणी[1] देव कैचा ॥ ४ ॥
लक्ष्मी देवाची सर्व सत्ता त्याची ।
त्याविण देवाची उरी नाहीं ॥ ५ ॥
दास ह्मणे देवा सावध असावें ।
दुश्चित नसावें सर्व काळ ॥ ६ ॥
(८) मन हें विवेकें विशाल[2] करावें ।
मग आठवावें परब्रम्ह ॥ १ ॥
परब्रह्म मनीं तरीच निवळे ।
ज़री बोधें गळे अहंकार ॥ २ ॥
अहंकार गळे संताचे संगतीं ।
मग आदिअंतीं समाधान ॥ ३ ॥
समाधान घडे स्वरूपीं राहतां ।
विवेक पहातां निःसंगाचा[3] ॥ ४ ॥

---

१ अंतकाळीं २ मोठें ३ परब्रह्माचा.

(९) प्रवृत्ति[1] सासुरें निवृत्ति[2] माहेर ।
तेथें निरंतर मन माझें ॥ १ ॥
माझें मनीं सदा माहेर सुटेना ।
सासुरें तुटेना काय करूं ॥ २ ॥
काय करूं मज लागला लौकिक ।
तेणें हा विवेक दुरी जाये ॥ ३ ॥
दुरी जाये हित मजची देखतां ।
प्रयत्न करूं जातां होत नाहीं ॥ ४ ॥
होत नाहीं प्रयत्न संतसंगेवीण ।
रामदास खूण सांगतसे ॥ ५ ॥
(१०) सर्व काळ गेला संसार करीतां ।
तरी सार्थकता कैसी घडे ॥ १ ॥
कैसी घडे भक्ती कैसी घडे मुक्ती ।
ह्मणोनिया चित्तीं गोष्टी धरा ॥ २ ॥
गोष्टी धरा मनीं स्वहितालागुनी ।
बैसा देवस्थानीं क्षण एक ॥ ३ ॥
क्षण एक गेला सुखाचा बोलतां ।
तेणें कांहीं चिंता वोसरेल[3] ॥ ४ ॥

---

१ प्रपंच २ परमार्थ ३ कमी होईल.

वोसरेल चिंता संसाराची माया ।
भजे रामराया दास ह्मणे ॥ ५ ॥
(११) जाणावा तो ज्ञानी पूर्ण समाधानी।
निःसंदेह मनीं सर्वकाळ ॥ १ ॥
मिथ्या देहभाव प्रारब्धा-आधीन ।
राखे समाधान पूर्णपणें ॥ २ ॥
आवडीनें करी कर्म उपासना ।
सर्वकाळ ध्यानारूढ[1] मन ॥ ३ ॥
जाणे ब्रह्मज्ञान स्वयें उदासीन ।
मानी तो वमन द्रव्यदारा ॥ ४ ॥
पदार्थाची हानी होतां नये काणी[2] ।
जयाची करणी बोले ऐसी ॥ ५ ॥
दास ह्मणे धन्य सर्वांसीं जो मान्य ।
जयाचा अनन्य समुदाय ॥ ६ ॥
(१२) जाणावा तो नर देवची साचार ।
वाचें निरंतर रामनाम ॥ १ ॥
सगुणी सद्भाव, नाहीं ज्ञान गर्व ।
तयालागीं सर्व सारिखेची ॥ २ ॥

---

१ ध्यानांत मग्न. २ क्लेश.

20252

निंदका वंदका संकटीं सांभाळी ।
मन सर्व-काळीं पालटेना ॥ ३ ॥
पालटेना मनीं परस्त्री कांचनीं ।
निववी वचनीं पुढिलांसी ॥ ४ ॥
पुढीलांसी नाना सूखें देत आहे ।
उपकारीं देह लावीतसे ॥ ५ ॥
लावीतसे देह रामभजनासी ।
रामी रामदासी हरिभक्ती ॥ ६ ॥

# भाग ७ वा.

## राजनीति.

### समर्थांचा शिवाजी महराजांस उपदेश.

### (१) राजधर्म.

सावधपणें प्रपंच केला । तेणें सुखची पावला ।
दीर्घ प्रयत्नें मांडला । कार्यभाग साधे ॥ १ ॥
आधीं मनुष्य ओळखावें । योग्य पाहूनि काम सांगावें ।
निकामी तरी ठेवावें । एकीकडे ॥ २ ॥
पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें ।
कार्यकर्त्याच्या गुणें । कार्यभाग होतो ॥ ३ ॥
कार्यकर्ता प्रयत्नीं जाड[2] । कांहींएक असला हेकाड[3] ।
तरी समर्थपणें पाठवण । केली पाहिजे ॥ ४ ॥
अमर्याद फिरवखोर[4] । यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ५ ॥
मनुष्य राजी राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें ।
कठीणपणें दुरी धरणें । कांहींएक ॥ ६ ॥

१ निरुपयोगी २ मोठा ३ हट्टी, एककल्ली ४ शत्रूस मिळणार फितूर झालेले.

समयीं मनुष्य कामा येतें । तया कारणें सोशिजे तें ।
न्याय सांडितां मग तें । सहजची खोटें ॥ ७ ॥
न्याय-सीमा उल्लंघू नये । उल्लंघिता होतो अपाय ।
न्याय नसतां उपाय । होईल कैसा ॥ ८ ॥
उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासूनि चेवला ।
समयीं धीर सांडला । तोही खोटा ॥ ९ ॥
संकटीं कंटाळो नये । करावें अत्यंत उपाय ।
तरी मग पाहतां काय । उणें आहे ॥ १० ॥
बंध[1] बांधावे नेटके । जेणेंकरितां चतुर तुके[2] ।
तांव[3] न होतां फिके । कारभार होती ॥ ११ ॥
धुरेनें[4] युद्धास जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें ।
धुराच करोन सोडणें । कित्येक लोक ॥ १२ ॥
उदंड मुंडे[5] असावीं । सर्वहा एक न करावीं ।
वेगळालीं कामें द्यावीं । सावधपणें ॥ १३ ॥
मोहरा[6] पेटला अभिमाना । मग तो जीवास पाहेना ।
मोहरे मिळवून नाना । वरी चेपटे करी ॥ १४ ॥

---

१ नियम, कायदा २ मान डोलवील ३ अमल × दुर्बळ, मंद ४ अग्रभाग घेऊन, पुढें होऊन ५ माणसें ( मुंड = मुंडकें डोकें ) ६ मुख्य पुढारी, सेनापति.

देखोनी व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती नाना वाटा ।
मस्त तो रेडा मोठा । काय करावा ॥ १५ ॥
रायांनीं करावें राजधर्म । क्षत्रीं करावें क्षात्रधर्म ।
ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नाना प्रकारें ॥ १६ ॥
तुरंगें शस्त्रें आणि स्वार । पाहिला पाहावा विचार ।
निवट्टं[1] जातां थेर थेर । शत्रू पळती ॥ १७ ॥
ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलो कांहींएक ।
एका मनोगतें[2] स्वामी सेवक । असतां बरें ॥ १८ ॥

## ( २ ) क्षात्र धर्म.

जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ।
कांहींतरी करूनि उपाय । पोट भरावें ॥ १ ॥
विन्मुख मरणीं नरक होती । वांचूनि येतां मोठी फजीती
इहलोक परलोक जाती । पाहाना कां ॥ २ ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ३ ॥
नजर करार राखणें । कार्य पाहून खतल[3] करणें ।
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होतीं ॥ ४ ॥

---

१ मारूं २ विचारानें ३ कापाकापी.

जैसा भांड्याचा[1] गलोला[2] । निर्भय भारामध्यें पडला ।
तैसा क्षत्री रिचवला[3] । परसैन्यामध्यें ॥ ५ ॥
निःशंकपणें भार फुटती । पर वीरांचे तवके[4] तुटती ।
जैसा बळिया[5] घालूनि घेती । भेरी उठतां ॥ ६ ॥
ऐसें अवघेचि उठतां । परदळाची कोण चिंता ।
हरणे लोळवी चित्ता[6] । देखत जैसा ॥ ७ ॥
मर्दे तकवा[7] सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय ।
कार्य प्रसंग समय । ओळखावा ॥ ८ ॥
कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल विचारें ।
युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥ ९ ॥
दोन्हीं दळें[8] एकवटें[9] । मिसळतातीं लखलखाटें ।
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडूनि ॥ १० ॥
देव मात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ ११ ॥
मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ १२ ॥

---

१ तोफांचा २ गोफण × क्षत्रिय ३ रिकामा पडला ४ तवका = जोर, शक्ति ५ बलाढ्य मनुष्य ६ वाघाची एक जात ७ धीर ८ सैन्यें ९ एकदम.

मरणहाक तो चुकेना । देह वांचवीतां वांचेना ।
विवेकी होऊनि समजाना । काय करावें ॥ १३ ॥
भले कुलवंत ह्मणावे । तेहीं वेगीं हजर व्हावे ।
हजीर न होतां कष्टावें । लागेल पुढें ॥ १४ ॥
देवद्रोही[1] तितुके कुत्ते[2] । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते[3] । यदर्थी[4] संशय नाहीं ॥१५॥
देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ[5] करावा ।
मुलूख बडवा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥१६॥
विवेक विचार सावधपणें ।
दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ।
तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला ॥ १७ ॥
अहो हे तुळजाभवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी[6] ।
रामदास ध्यातो[7] मनीं । यन्निमित्त[8] ॥ १८ ॥

### (२) समर्थांचें संभाजीस पत्र.

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापी नसावें ।
तजवीज करीत असावें । एकांत स्थळीं ॥ १ ॥
कांहीं उग्रस्थिती सांडावी । सौम्यता ते धरावी ।
चिंता लागावी परावी । अतर्यामीं ॥ २ ॥

---

१ देवाचा द्वेष करणारे २ कुत्रे ३ जय ४ याविषयीं ५ ओरडाओरड ६ देणारा ७ चिंतन करतो ८ ज्याकरितां

मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ।
सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥
पाणवठी[1] तुंब[2] निघेना । तरी मग पाणी चालेना ।
तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जनाचा प्रवाह चालला । ह्मणजे कार्यभाग आटोपला ।
जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥
श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ।
मग जाणावें फावलें । गनीमासी[3] ॥ ६ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास जाये ।
धीर धरोन महत्कार्य । समजून करावें ॥ ७ ॥
राजी राखतां जग । मग कार्यभागाची लगबग ।
ऐसें जाणोनि सांग[4] । समाधान राखावें ॥ ८ ॥
सकळ लोक एक करावे । गनीम निवटून[5] काढावे ।
ऐसें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥ ९ ॥
आधीं गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।
ऐसें न होतां धक्के । राज्यास होती ॥ १० ॥
समय प्रसंग ओळखावा । राग निपटून[6] काढावा ।
आला तरी कळों न द्यावा । जनामध्यें ॥ ११ ॥

---

१ पाण्याच्या जागेंत २ चाकाचा तुंबा, मांदळ ३ शत्रु ४ पूर्ण ५ मारून ६ सर्वस्वी

राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊन करावे सेवक ।
लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंच नये ॥ १२ ॥
वहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावें ।
कष्टें करूनि घसरावे । म्लेंच्छावरी ॥ १३ ॥
आहे तितुकें जतन करावे । पुढें आणिक मिळवावे ।
महाराष्ट्र-राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ १४ ॥
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥ १५ ॥
शिवराजास आठवावे । जीवित्व[1] तृणवत्[2] मानावें ।
इहलोकीं परलोकीं राहावे । कीर्तिरूपें ॥ १६ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं । १७ ॥
शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाचें कैसें बोलणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसें असें ॥ १८ ॥
सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग[3] । कैसी असे ॥ १९ ॥
त्याहूनि करावे विशेष[4] । तरीच म्हणावे पुरूष ।
या उपरी आतां विशेष । काय लिहावे ॥ २० ॥

---

१ जगणें २ तुच्छ ३ घाई ४ अधिक.

मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ।
सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥
पाणवठीं[1] तुंब[2] निघेना । तरी मग पाणी चालेना ।
तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जनाचा प्रवाह चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला ।
जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥
श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ।
मग जाणावें फावलें । गनीमासी[3] ॥ ६ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास जाये ।
धीर धरोन महत्कार्य । समजून करावें ॥ ७ ॥
राजी राखतां जग । मग कार्यभागाची लगबग ।
ऐसें जाणोनि सांग[4] । समाधान राखावें ॥ ८ ॥
सकळ लोक एक करावे । गनीम निवटून[5] काढावे ।
ऐसें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥ ९ ॥
आधीं गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।
ऐसें न होतां धके । राज्यास होती ॥ १० ॥
समय प्रसंग ओळखावा । राग निपटून[6] काढावा ।
आला तरी कळो न द्यावा । जनामध्यें ॥ ११ ॥

---

१ पाण्याच्या जागेंत २ चाकाचा तुंबा, मांदळ ३ शत्रू ४ पूर्ण
५ मारून ६ सर्वस्वी

राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊन करावे सेवक ।
लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंच नये ॥ १२ ॥

बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावें ।
कष्टें करूनि घसरावे । म्लेंच्छावरी ॥ १३ ॥

आहे तितुकें जतन करावे । पुढें आणिक मिळवावे ।
महाराष्ट्र-राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ १४ ॥

लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥ १५ ॥

शिवराजास आठवावे । जीवित्व तृणवत्[2] मानावें ।
इहलोकीं परलोकीं राहावे । कीर्तिरूपें ॥ १६ ॥

शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं । १७ ॥

शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाचें कैसें बोलणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसें असें ॥ १८ ॥

सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग[3] । कैसी असे ॥ १९ ॥

त्याहूनि करावे विशेष[4] । तरीच म्हणावे पुरूष ।
या उपरी आतां विशेष । काय लिहावे ॥ २० ॥

---

१ जगणें २ तुच्छ ३ घाई ४ अधिक.

## राजकारण.

(१) कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचि धरावें ।
विवरलेंचि विवरावें । पुन्हां निरूपण ॥ १ ॥
अनन्य[1] राहे समुदाय । इतर जनास उपजे भाव[2] ।
ऐसा आहे अभिप्राय[3] । उपायाचा ॥ २ ॥
मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥ ३ ॥
चौथा अत्यंत साक्षेप[4] । फेडावे नाना आक्षेप ।
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ।
जागावें पराचें अंतर[5] । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायासी अंतर[6] । पडों नेदावें ॥ ५ ॥
संकेतें लोक वेधावा[7] । एकूनएक बोधावा ।
प्रपंच सावरावा । यथानुशक्त्या ॥ ६ ॥
प्रपंच-समय ओळखावा । धीर बहुत असावा ।
संबंध पडों नेदावा । अतिपरिचयाचा ॥ ७ ॥
उपाधीस[8] विस्तारावे । उपाधींत न सांपडावे ।
नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ८ ॥

---

१ एकनिष्ठ २ सद्भाव, भक्ति ३ हेतु, मर्म ४ उद्योग, प्रयत्न ५ अंतःकरण ६ फरक ७ आकर्षण करून घ्यावा ८ व्यापास.

दोष देखोन झांकावें । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ ९ ॥
तऱ्हें[1] भरोंच नये । सुचावे नाना उपाय ।
नव्हे[2] तेचि करावें कार्य । नाना प्रयत्नें ॥ १० ॥
फड[3] नासोंचि नेदावा । पहिला प्रसंग सांवरावा ।
अतिवाद न करावा । कोणी एकासी ॥ ११ ॥
दुसऱ्याचें अभीष्ट[4] जाणावें । बहुतांचे बहुत सोसावें ।
न सोसे तरी जावें । दिगंतराप्रती ॥ १२ ॥
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें ।
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ १३ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १४ ॥
शांती[5] करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।
क्रिया[6] करून करवावी । बहुतांकरवी ॥ १५ ॥
करणें असेल अपाय । तरी बोलोन दाखवूं नये ।
परस्परेंचि प्रत्यय । प्रचितीस आणावा ॥ १६ ॥
जो बहुताचे सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ।

---

१ एककल्लीपणा करूं नये २ न होणारे ३ सभा ४ हित ५ चित्ताची शांती ठेवून ६ सत्क्रिया.

अवघेंचि सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १७ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु तें कळोंच नेदावें ।
परपीडेपरी नसावें । अंतःकरण ॥ १८ ॥
लोक पारखून[1] सोडावे । राजकारणें अभिमान झाडावे
पुन्हा मेळवून घ्यावे । दुरिल्या दोरें ॥ १९ ॥
हिरवटासी[2] दुरी धरावें । कचरटासी[3] न बोलावें ।
संबंध पडतां सोडून जावें । एकीकडे ॥ २० ॥
(२) ज्ञानी आणि उदास[4] । समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकाश । एकांत सेवावा ॥ १ ॥
जेथें तजविजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणिमात्रांची स्थिती गती । कळों येते ॥ २ ॥
अखंड राहतां सलगी[5] होते । अति परिचयें अवज्ञा[6] घडते
या कारणें विश्रांतीतें । घेतां नये ॥ ३ ॥
आळसें आळस केला । तरी मग कारभारचि बुडाला ।
अंतरहेतु चुकत गेला । समुदायाचा ॥ ४ ॥
उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें ।
अवकाश कैचा कृत्रिमें[7] । करावयासी ॥ ५ ॥

---

१ परीक्षा करून ठेवावे २ तामसी ३ हलके ४ निरपेक्ष
५ विशेष परिचय, मैत्री ६ अपमान ७ कपट

या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता[1] कष्टी
राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ ६ ॥

नष्टासी[2] नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।
आपणावरी विकल्पाचे गोंवें[3] । पडोंचि नेदी ॥ ७ ॥

काटीनें काटी झाडावी । झाडावी परी ते कळों नेदावी
कळकटेपणाची[4] पदवी । असों द्यावी ॥ ८ ॥

न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें
गचगचेंत[5] पडतां तें । चमत्कारें नव्हें ॥ ९ ॥

कोणीएक काम करतां होतें ।
न करितां तें मागें पडतें ।
याकारणें ढिलेपण तें । असोंच नये ॥ १० ॥

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ ११ ॥

अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडलें ।
याकारणें ऐसें न घडलें । पाहिजे कीं ॥ १२ ॥

मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें
कितीएक खलक[6] उगवावे । राजकारणामध्यें ॥१३॥

---

१ न होता  २ दुष्ट  ३ गुंते, घोटाळे  ४ भांडखोरपणाची
५ गचगच = ढिलाई  ६ कारस्थानी लोक

अवघेंचि सोसितां उरेना । महत्व आपुलें ।। १७ ।।
राजकारण बहुत करावें । परंतु तें कळोंच नेदावें ।
परपीडेपरी नसावें । अंतःकरण ।। १८ ।।
लोक पारखून[1] सोडावे । राजकारणें अभिमान झाडावे ।
पुन्हा मेळवून घ्यावे । दुरिल्या दोरें ।। १९ ।।
हिरवटासी[2] दुरी धरावें । कचरटासी[3] न बोलावें ।
संबंध पडतां सोडून जावें । एकीकडे ।। २० ।।

(२) ज्ञानी आणि उदास[4] । समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकाश । एकांत सेवावा ।। १ ।।
जेथें तजविजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणिमात्रांची स्थिती गती । कळों येते ।। २ ।।
अखंड राहतां सलगी[5] होते । अति परिचयें अवज्ञा[6] घडते ।
या कारणें विश्रांतीतें । घेतां नये ।। ३ ।।
आळसें आळस केला । तरी मग कारभारचि बुडाला ।
अंतरहेतु चुकत गेला । समुदायाचा ।। ४ ।।
उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें ।
अवकाश कैचा कृत्रिमें[7] । करावयासी ।। ५ ।।

---

१ परीक्षा करून ठेवावे २ तामसी ३ हलके ४ निरपेक्ष
५ विशेष परिचय, मैत्री ६ अपमान ७ कपट

या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता[1] कष्टी
राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ ६ ॥
नष्टासी[2] नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।
आपणावरी विकल्पाचे गोंवें[3] । पडोंचि नेदी ॥ ७ ॥
काटीनें काटी झाडावी । झाडावी परी ते कळो नेदावी
कळकटेपणाची[4] पदवी । असों द्यावी ॥ ८ ॥
न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें
गचगचेंत[5] पडतां तें । चमत्कारें नव्हें ॥ ९ ॥
कोणीएक काम करतां होतें ।
न करितां तें मागें पडतें ।
याकारणें ढिलेपण तें । असोंच नये ॥ १० ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ ११ ॥
अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडलें ।
याकारणें ऐसें न घडलें । पाहिजे कीं ॥ १२ ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें
कितीएक खलक[6] उगवावे । राजकारणामध्यें ॥१३॥

---

१ न होता २ दुष्ट ३ गुंते, घोटाळे ४ भांडखोरपणाची
५ गचगच = ढिलाई ६ कारस्थानी लोक

बोलके पहिलवान कळकटे । तयासीच व्यावें झटें[1] ।
दुर्जनें राजकारण दाटे[2] । ऐसें न करावें ॥ १४ ॥
खळ दुर्जनासी भ्याले । राजकारण नाहीं राखिलें ।
तेणें अवघें प्रगट झालें । वेरें वाईट ॥ १५ ॥
दुर्जन प्राणी समजावें । परी ते प्रगट न करावें ।
सज्जनापरीस आळवावें[3] । महत्व देऊनी ॥ १६ ॥
जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
या कारणें ते वाट । बुझून टाकावी ॥ १७ ॥
हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या संभ्रमें[4] । जाऊं नये ॥ १८ ॥
हुंब्यास हुंबा[5] लावून द्यावा ।
टोणप्यास टोणपा[6] आणावा ।
लौंदास[7] पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ १९ ॥
धटासी आणावा धट[8] । उद्धटासी पाहिजे उद्धट ।
खटनटासी[9] खटनट । अगत्य करी ॥ २० ॥
(३) कोणाचा भर्वसा न धरावा ।
आपुला आपण विचार करावा ।

---

१ झगडण्यास २ दोबेल, अडखळेल ३ प्रसन्न करावें ४ गोंधळानें ५ रडका ६ मूर्ख विद्याहीन ७ लबाड ८ धटिंगण ९ दुष्ट.

तकवा[1] उदंड धरावा । कोणीएका विषयीं ॥ १ ॥
देह दुःखें कदरों[2] नये । उदंडची करावे उपाय ।
मग सर्व सुखासी काय । उणें आहे ॥ २ ॥
एकांतीं चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।
नाना विचारणा करावी । अरि-मित्रांची ॥ ३ ॥
प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये ।
सुचावे नाना उपाय । अनेकाविषयीं ॥ ४ ॥
धुरेनें[3] धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ।
उद्योग रहित कामा नये । पशु जैसा ॥ ५ ॥
उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस आला ।
ह्मणजे जाणावा चेवला[4] । बुद्धीपासूनी ॥ ६ ॥
कार्यकर्ते दुरी करावे । प्रसंगें सर्वेचि हातीं धरावे ।
परंतु शोधोनि पहावें । कपटाविषयीं[5] ॥ ७ ॥
आपल्यां मनाशी रोधावें । परांतर शोधावें ।
क्षणक्षणा सांभाळावें । बदलेल म्हणोनी ॥ ८ ॥
पाहिलेंचि पाहावें । केलेंचि करावें ।

---

१ धीर २ फिकीर करूं नये ३ धुरेवरील—आघाडीवरील मनुष्यानें—सेनापतीनें ४ च्युत झाला ५ कपटी आहेत कीं एकनिष्ठ आहेत या विषयीं ६ आवरावें.

शोधलेंचि शोधावें । राजकारण ॥ ९ ॥
इशारतीचें[1] बोलतां नये । बोलायाचें लिहों नये ।
लिहायाचें सांगों नये । जबाबीनें ॥ १० ॥

(४) शक्तीनें पावती सुखें । शक्ती नसतां विटंबना ।
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥ १ ॥
कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी[2] दिसे ।
शक्ती तों सर्वही सुखें । शक्ती आनंद भोगवी ॥२॥
सार संसार शक्तीनें । शक्तीनें शक्ति भोगिजे ।
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ॥ ३ ॥
शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ।
शक्ति युक्ति जयें ठायीं । तेथें श्रीमंत नांदती ॥ ४ ॥
अचूक चुकेना कोठें । त्याचीं राज्यें समस्तही ।
युक्तीनें चालती सेना । युक्तीनें युक्ति वाढवी ॥ ५ ॥
उदंड खस्तिचीं[3] कामें । मर्द मारूनि जातसे ।
नामर्द काय ते लेंडी[4] । सदा दुश्चीतलालची ॥ ६ ॥
फितव्यानें[5] बुडतीं राज्यें । खबर्दारी असेचिना ।
युक्तिना शक्तिना बेगीं[6] । लोक राजी असेचिना ॥७॥

---

१ इशारत-खूण, सूचना २ आशाळभूत ३ कष्टाची ४ भित्र ५ फंदफितुरीनें ६ त्वरेनें, झटपट.

बेदादी[1] बेकैदसेना[2] । कारभारीच चोरटे ।
धण्यास राखणें राजी । कदाकाळीं घडेचिना ॥ ८ ॥
चोरटी होरटी[3] उंदे[4] । नासके लाच इच्छिती ।
लोंढिचे[5] दुरि घालावे । मारावे राजकारणें ॥ ९ ॥
सेवका आवरूं नेणे । तो राजा मूर्ख जाणिजे ।
मूर्खाचें राज्य राहेना । कोणाचें कोण ऐकतो ॥१०॥
लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळें वळें ।
बंद बेबंद[6] जाणावे । तावे[7] तावे परोपरी ॥ ११ ॥
खर्त खोत्तर काढावे । तांदुळासारिखे खडे ।
खरें तें आदरें घ्यावें । खोटें सर्वत्र टाकिती ॥ १२ ॥
सगट सारिखें जेथें । तेथें होते बरोबरी ।
सार गार कळेना कीं । जाणते नेणते जनीं ॥ १३ ॥
कांहीं एक परीक्षावें । शोधावें बहुतांपरी ।
नेटकें कार्य साधावें । रोधावे कुटिलाजना ॥ १४ ॥
असों हें बोलणें झालें । युक्तीवीण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे १५

स्फुट श्लोक

---

१ बेबंदशाहीची २ अनियंत्रित ३ हटवादी ४ गर्विष्ठ
५ गुलाम, दुष्ट ६ अराजक ७ अम्मत

(५) हरिकथानिरूपण । नेमस्तपणें राजकारण ।
वर्तायाचें लक्षण । तें ही असावें ॥ १ ॥
पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे ।
सकळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ २ ॥
दीर्घ सूचना आधीं कळे । सावधानपणें तर्क प्रबळे ।
जाणजाणोंचि निवळे । यथायोग्य ॥ ३ ॥
जो एकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर ।
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भींचे ॥ ४ ॥
आधीं शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ ५ ॥
जयासी यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे[1] ।
धीटपणें प्रगटे दडे । ऐसा नव्हे ॥ ६ ॥
सांकडीमध्यें[2] वर्तों जाणे । उपाधीमध्यें मिळों जाणे ।
अलिप्तपणें[3] राखों जाणे । आपणासी ॥ ७ ॥
त्यावेगळें कांहींच नसें । पाहों जातां तो न दिसे ।
न दिसोन वर्तवीतसे । प्राणिमात्रांसी ॥ ८ ॥
राखों जाणे नीतिन्याय । न करे न करवी अन्याय ।
कठीण प्रसंगीं उपाय । करूं जाणे ॥ ९ ॥

---

१ शिरे, प्रवेश करी २ संकटामध्यें ३ विलग.

ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा ।
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १० ॥

(६) सृष्टीमध्यें बहु लोक । परिभ्रमणें[1] कळें कौतुक ।
नाना प्रकारींचे लोक । आढळों लागती ॥ १ ॥
एखादां आढळे गाजी[2] । सकळ लोक अखंड राजी ।
सदा सर्वदा आवेड ताजी । प्राणिमात्रांची ॥ २ ॥
चुकोन उदंड आढळतें । भारी मनुष्य दृष्टीस पडतें ।
महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ॥ ३ ॥
ऐसा आढळतां लोक । चमत्कारें गुणग्राहिक ।
क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचें ॥ ४ ॥
सकल अवगुणामध्यें अवगुण ।
आपले अवगुण वाटती गुण ।
मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ॥ ५ ॥
ढाळेचि[3] काम होतें सदा । तें जपल्यानें नव्हे सर्वदा ।
पीळ पेंचाची[4] आपदा । आढळेचिना ॥ ६ ॥
एकासी अभ्यासितां नये । एकासी स्वभावें ये ।
ऐसा भगवंताचा महिमा काय । कैसा कळेना ॥ ७ ॥

---

१ फिरल्यानें २ पराक्रमी ३ सहजगत्या ४ वांकड्यामार्गाची

मोठीं राजकारणें चुकतीं । राजकारणीं वेढा[1] लाविती ।
नाना चुकीची फजिती । चहूंकडे ॥ ८ ॥
या कारणें चुकों नये । म्हणोन उदंड उपाय ।
उपायाचा अपाय । चुकतां होय ॥ ९ ॥
अवघे फडचि[2] नासती । लोकांचीं मनें भंगतीं ।
कोठें चुकती तें युक्ती । कांहीं कळेना ॥ १० ॥
व्यापेंविण आटोप[3] केला । तो अवघा घसरतचि[4] गेला
अकलेचा बंद[5] नाहीं घातला । दुरी दृष्टीनें ॥ ११ ॥
एखादें मनुष्य तें शिळें[6] । त्याचें करणेंचि बावळें ।
नाना विकल्पाचें[7] जाळें । करून टाकी ॥ १२ ॥
तें आपणासी उकलेना । दुसऱ्यास कांहींच कळेना ।
नाचें विकल्पें कल्पना । ठायीं ठायीं ॥ १३ ॥
त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या ।
कोणें येऊन आटोपाव्या ।
ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट बुद्धी ॥ १४ ॥
ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावीना ।
सावचित करुनिया मना । समाधानें असावें ॥ १५ ॥

---

१ डाव अंगावर घेतात २ सभा ३ खटाटोप ४ फसत ५ नियमन ६ उत्साहशून्य ७ संशयाचें.

धांवधांवो उपाधी वेष्टी । आपण कष्टी लोकही कष्टी ।
हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची ॥ १६ ॥
लोक बहुत कष्टी झाला । आपणही अत्यंत त्रासला ।
व्यर्थचि केला गलबला । कासयासी ॥ १७ ॥
असो उपाधीचें काम ऐसें । कांहीं वरें कांहीं काणोसें[1] ।
सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ॥ १८ ॥
आपणास उपाधि मुळीच नाहीं ।
ऋणानुबंधें मिळाले सर्वही ।
आल्या गेल्याची क्षिति नाहीं । ऐसें झालें पाहिजे ॥१९॥
कांहीं गलबला कांहीं निवळ[2] ।
ऐसा कंठींत[3] जावा काल ।
जेणेंकरितां विश्रांति वेळ । आपणांसी फावे ॥ २० ॥
दा. १९-८

(७) जीव जीवांत घालावा । आत्म्यांत आत्मा मिसळावा ।
राहराहो शोध घ्यावा । परांतराचा[4] ॥ १ ॥
दुसऱ्याचे जीवींचें[5] कळेना । परांतर तें जाणवेना ।
वश होती लोक नाना । कोण्या प्रकारें ॥ २ ॥

---

१ वांकडें २ शांत ३ घालवीत ४ दुसऱ्याचा अंतःकरणाचा
५ मनांतील.

श्रेष्ठ कार्यें करी तो श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ ।
कर्मानुसार प्राणी नष्ट । अथवा भले ॥ ३ ॥
उदंड बाजारी मिळाले । परी ते धूर्तेंचि आळिले[१] ।
धूर्तापाशीं कांहीं न चलें । बाजाऱ्यांचें ॥ ४ ॥
या कारणें मुख्य मुख्य । तयांसी करावें सख्य ।
येणें कारितां असंख्य । बाजारी मिळती ॥ ५ ॥
ओळखीनें ओळखी साधावी । बुद्धीनें बुद्धि बोधावी ।
नीतिन्यायें वाट रोधावी । पाषांडाची ॥ ६ ॥
वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ॥ ७ ॥
एकें ठायीं बैसोन राहिला । तरी मग व्यापचि बुडाला ।
सावधपणें ज्याला त्याला । भेटी द्यावी ॥ ८ ॥
भेटभेटों उरी[२] राखणें । हे चातुर्याचीं लक्षणें ।
मनुष्यमात्र[३] उत्तम गुणें । समाधान पावें ॥ ९ ॥

दा. १५-१

(८) रेखा[४] तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें ।

---

१ प्रसन्न केलें २ वारंवार भेटून पुन्हा भेटण्याची उत्कट इच्छा कायम ठेवणें ३ सर्व मनुष्यें ४ सर्व रेषा पुसतां येतात, हें अनुभवास येतें, तर ललाट-रेषा पुसतां येणार नाहीं, असें डोळे झांकून कां खरें मानावें ?

डोळे झांकणी करावी ते । काय निमित्त ॥ १ ॥
बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं बुडाले ।
मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा ॥ २ ॥
उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पहावें ।
खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ ३ ॥
माणुस हेंकाड आणि कच्चें । मान्य करावें तयाचें ।
येणें प्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ॥ ४ ॥
वेडें करावें शहाणें । तरीच जिणें श्लाघ्यवाणें ।
उगेंच वादांग वाढविणें । हें मूर्खपण ॥ ५ ॥
मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें ।
कांहींच कळों नेदावें । विवेकबळें ॥ ६ ॥
उगीच करिती गडबड ।
परी करून दाखविणें हें अवघड ।
परस्थळ साधणें जड । कठीण आहे ॥ ७ ॥
धक्के चपेटे सोसावें[1] । नीच शद्ध साहत[1] जावें ।
पस्तावोन परावें । आपलें होती ॥ ८ ॥
प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें ।
लीनता धरूनि जावें । जेथ तेथें ॥ ९ ॥

---

१ सोसत.

कुग्रामें[1] अथवा नगरें । पाहावीं घराचीं घरें ।
भिक्षामिषें लहान थोरें । परीक्षून सोडावीं ॥ १० ॥
बहुतां कांहींतरी सांपडे । विचक्षण लोकीं मैत्री घडे ।
उगच बसतां कांहींच न घडे । फिरणें विवरणें ॥ ११ ॥
सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधींच घ्यावें ।
जाऊं ये तिकडे जावें । विवेकेंसहित ॥ १२ ॥
जैसें जयास पाहिजे । तैसें तयास दीजे ।
तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळा मान्य ॥ १३ ॥
भूमंडळीं सकळां मान्य । तो ह्मणों नये सामान्य ।
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ॥ १४ ॥
ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजय करणें ।
मग तयास काय उणें । जेथ तेथें ॥ १५ ॥

दा. १५-६

---

१ खेडी.

# भाग ८ वा.

## दासबोधांतर्गत सुभाषितें.

### दशक १ ला ( पूर्वार्ध )

### (१) सद्गुरुमहिमा.

परीस आपणा ऐसे करीना । सुवर्णे लोह[१] पालटेना ।
उपदेश करी बहुत जना । अंकित[२] सद्गुरूचा ॥१॥
शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णे सुवर्ण करितां नये
ह्मणोनी उपमा न साहे[३] । सद्गुरुसी परिसाची ॥ २ ॥
सद्गुरु ह्मणो लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशवंत ।
ज्याचें द्वारीं असें तिष्ठत[४] । मोक्ष्य-लक्ष्मी ॥ ३ ॥
स्वर्गलोक इंद्रसंपत्ती । हे काळांतरी[५] विटंबती[६] ।
सद्गुरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ ४ ॥
हरिहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश एक । सद्गुरुपद ॥ ५ ॥

### (२) संतमहिमा.

मोक्ष श्रिया अलंकृत । ते हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्र असंख्यात । नृपती केले ॥ १ ॥

---

१ लोखंड २ शिष्य ३ शोभत नाहीं ४ उभी ५ कल्पांत-काळीं ६ नाश पावती.

महाराजे चक्रवर्ती । झाले आहेत, पुढें होती ।
परंतु कोणी सायुज्यमुक्ती । देणार नाहीं ।। २ ।।
जे त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संत सज्जन ।
तया संतांचें महिमान[१] । काय म्हणोनी वर्णावे ।।३।।
जें त्रैलोक्याहूनि वेगळें । जें वेद श्रुतीशी ना कळे ।
तेंचि जयाचेनि बोलें[२] । परब्रम्ह अंतरीं ।। ४ ।।

(३) परमार्थमहिमा.

परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक ।
परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ।। १ ।।
परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।
या परमार्थाची सरी[३] । कोणास द्यावी ।। २ ।।
अनंत जन्मांचें पुण्य जोडें[४] । तरीच परमार्थ घडे ।
मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ।। ३ ।।
जेणें परमार्थ ओळखिला । तेणें जन्म सार्थक केला ।
येर तो पापी जन्मला । कुलक्षयाकारणें ।। ४ ।।
आहे तरी परम सुगम । परी जनासी झाला दुर्गम ।
कां जयाचें चुकलें वर्म[५] । सत्समागमाकडे ।। ५ ।।

---

१ मोठेपणा २ प्रसन्न होतें ३ बरोबरी. ४ मिळतें
५ रहस्य.

नाना साधनांचे उधार । हा रोकडा[1] ब्रह्मसाक्षात्कार ।
वेद शास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये ॥ ६ ॥
साराचेंहि निजसार । अखंड अक्षय अपार ।
नेऊं न शकती तस्कर[2] । कांहीं केल्या ॥ ७ ॥
तयास नाहीं राजभय । अथवा नाहीं अग्निभय ।
अथवा श्वापदभय[3] । बोलोंच नये ॥ ८ ॥
मागा योगिये समर्थ । त्यांचाही निजस्वार्थ ।
यासी बोलिजे परमार्थ । परम गुह्य[4] ह्मणोनी ॥ ९ ॥
जेहीं[5] शोधून पाहिला । त्यासी अर्थ सांपडला ।
येरां[6] असोनि अलभ्य झाला । जन्मोजन्मीं ॥ १० ॥
भल्यानें परमार्थीं भरावें । शरीर सार्थक करावें ।
पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करूनी ॥ ११ ॥

## (४) नरदेहमहिमा.

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे[7] परमार्थलाहो[8] । तो तो पावे सिद्धीतें ?
या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ।

---

१ रोख २ चोर ३ व्याघ्र सिंहादि हिंस्र पशू ४ अत्यंत गूढ
५ ज्यांनीं ६ इतर लोकांना ७ करावा ८ परमार्थाची इच्छा.

मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ॥ २ ॥
पशुदेहीं नाहीं गती[1] । ऐसें सर्वत्र बोलती ।
म्हणोनी नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ॥ ३ ॥
म्हणोनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहामध्यें वरिष्ठ ।
जयाचेनि चुकें अरिष्ट । यमयातनेचें ॥ ४ ॥
नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन ।
परंतु हा परोपकारें झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥५॥
सांग[2] नरदेह जोडले । आणि परमार्थबुद्धि विसरले ।
ते मूर्ख कैसें भ्रमले । मायाजाळीं ॥ ६ ॥
देह परमार्थी लाविलें । तरीच याचें सार्थक झालें ।
नाहींतरी हें व्यर्थचि गेलें । नाना आघातें[3] मृत्युपंथें ॥७॥

## दशक २ रा.

### (५) मूर्खलक्षण.

जन्मला जयाचे उदरीं[4] । तयासीं जो विरोध करी ।
सखी मानिली अंतुरी[5] । तो एक मूर्ख ॥ १ ॥
आपण आपुली करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ती ।
सांगे वडिलांची कीर्ति । तो एक मूर्ख ॥ २ ॥

---

१ सद्गती—मोक्ष २ अव्यंग - कोणतेही इंद्रियव्यंग नसतां ३ अपघातानें ४ पोटीं ५ स्त्री.

धरूनि परावी[1] आस[2] । प्रयत्न सोडी सावकाश ।
निसुगाईचा[3] संतोष । मानी, तो एक मूर्ख ॥ ३ ॥
औषध न घे असोन व्यथा । पथ्य न करी सर्वथा ।
न मिळे[4] आलिया पदार्था । तो एक मूर्ख ॥ ४ ॥
आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन ।
रक्षू नेणें मानाभिमान । तो एक मूर्ख ॥ ५ ॥
स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनुपकार ।
करी थोडें बोलें फार । तो एक मूर्ख ॥ ६ ॥
विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ[5] सामर्थ्य ना मान ।
कोरडाच वाहे[6] अभिमान । तो एक मूर्ख ॥ ७ ॥
पुत्र कलत्र[7] आणि दारा । इतकाच मानुनिया थारा[8] ।
विसरोन गेला ईश्वरा । तो एक मूर्ख ॥ ८ ॥
देवद्रोही[9] गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही ।
ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो एक मूर्ख ॥ ९ ॥
परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख ।
गेले वस्तूचा करी शोक । तो एक मूर्ख ॥ १० ॥

---

१ दुसऱ्याची २ आशा ३ आळसाचा ४ दैवानें पुढें आलेला पदार्थ जो आवडून घेत नाही ५ पराक्रम ६ बाळगतो ७ बायको ८ आश्रय ९ देवाविषयीं द्रोह = द्वेष = कपट करणारा. त्याच-प्रमाणें गुरुद्रोही इ.

अनीतीनें द्रव्य जोडी । धर्मनीति न्याय सोडी ।
संगतीचे मनुष्य तोडी । तो एक मूर्ख ॥ ११ ॥
आपण वाचीना कधीं । कोणास वाचाया नेदी ।
पुस्तक बांधोन ठेवी बंदी । तो एक मूर्ख ॥ १२ ॥

### ( ६ ) नरदेहसार्थकता

नरदेहीं आलिया एक । कांहीं करावें सार्थक ।
जेणें पाविजे परलोक । परम दुर्लभ जो ॥ १ ॥
विधियुक्त[1] ब्रह्मकर्म । अथवा दयादानधर्म ।
अथवा करणें सुगम[2] । भजन भगवंताचें ॥ २ ॥
अनुतापें[3] करावा त्याग । अथवा करणें भक्तियोग ।
नाहीं तरी धरणें संग । साधुजनाचा ॥ ३ ॥
काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें[4] ।
कांहीं तरी एक भजनें । सार्थक करावें ॥ ४ ॥
नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।
यथानुशक्त्या चित्तवित्त । परमेश्वरीं लावावें ॥ ५ ॥
कांहींच जो न धरी मनीं । तो मृतप्राय वर्ते जनीं ।
जन्मा येऊन तेणें जननीं । वायाच कष्टविली ॥ ६ ॥

---

१ शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें २ सोपें ३ पश्चात्तापानें
४ पाण्यानें.

## (७) रजोगुण.

माझें घर माझा संसार । देव कैंचा आणिला थोर ।
ऐसा करी जो निर्धार[1] । तो रजोगुण ॥ १ ॥
माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता[2] ।
इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण ॥ २ ॥
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
दुसऱ्याचें अभिलाषावें[3] । तो रजोगुण ॥ ३ ॥
कैंचा धर्म कैंचें दान । कैंचा जप कैंचें ध्यान ।
विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ॥ ४ ॥
मी तरुण मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर ।
मी सकळामध्यें थोर । म्हणे तो रजोगुण ॥ ५ ॥
दुसऱ्याचें सर्व जावें । माझेंच बरें असावें ।
ऐसें आठवें स्वभावें[4] । तो रजोगुण ॥ ६ ॥
कां मागें जें जें भोगिलें । तें तें मनीं आठवलें ।
दुःख अत्यंत वाटलें । तो रजोगुण ॥ ७ ॥
वैभव देखोन दृष्टी । आवडी उपजली पोटीं[5] ।
आशागुणें[6] हिंपुटी[7] । करी तो रजोगुण ॥ ८ ॥
जें जें दृष्टी पडिलें । तें तें मनें मागितलें ।

---

१ निश्चय २ मुलगी ३ हरण करण्याची इच्छा धरावी ४सहज प्रकृती-स्वभावामुळें ५अंतःकरणांत ६मिळण्याच्या इच्छेमुळें ७कष्टी

लभ्य[1] नसतां दुःख झालें । तो रजोगुण ॥ ९ ॥
देवाकारणीं लाजाळु । उदरालागीं कष्टाळू ।
प्रपंचीं जो स्नेहाळू । तो रजोगुण ॥ १० ॥

(८) तमोगुण.

संसारीं दुःखसंबंध । प्राप्त होतां उठे खेद ।
कां अद्‌भुत आला क्रोध । तो तमोगुण ॥ १ ॥
शरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता नोळखे पिता ।
बंधु बहिण आणि कांता । ताडी[2] तो तमोगुण ॥२॥
किडा मुंगी आणि श्वापद । याचा करूं आवडे वध[3] ।
अत्यंत जो कृपामंद[4] । तो तमोगुण ॥ ३ ॥
सत्कर्मे तीं नावडती । नाना दोष ते आवडती ।
पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ॥ ४ ॥
परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास ।
संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ॥ ५ ॥
स्नान संध्या नेम नसे । स्वधर्मी भ्रष्टला दिसे ।
अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ॥ ६ ॥
उगेंच खावें उगेंच असावें । स्तब्ध[5] होऊन बैसावें ।
कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ॥ ७ ॥

---

१ मिळण्यास योग्य २ मारी ३ मृत्यु ४ निष्ठुर ५ गप्प–आळशी – कांहीएक न करितां.

## ( ९ ) सत्वगुण.

संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ[1] दावी ।
भजनक्रिया उपजवी । तो सत्वगुण ॥ १ ॥
स्नानसंध्या पुण्यशीळ । अभ्यंतरीचा[2] निर्मळ ।
शरीर वस्त्रें सोज्वळ[3] । तो सत्वगुण ॥ २ ॥
शब्द कठिण न बोले । अति नेमेंसी चाले ।
योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ॥ ३ ॥
शांति क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया ।
सत्वगुण जाणावा तया । अंतरीं[4] आला ॥ ४ ॥
आले अतीत[5] अभ्यागत । जाऊं नेदी भुकिस्त[6] ।
यथानुशक्त्या[7] दान देत । तो सत्वगुण ॥ ५ ॥
जेणें जिंकिली रसना[8] । तृप्त जयाची वासना ।
जयास नाहीं कामना[9] । तो सत्वगुण ॥ ६ ॥
होणार तैसें होत जात । प्रपंचीं आला आघात[10] ।
डळमळीना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ ७ ॥
आपकार्याहून[11] जीवीं[12] । परकार्यसिद्धि करावी ।

---

१ निर्मळ २ अंतःकरणाचा ३ स्वच्छ ४ अंतःकरणांत ५ अतिथी ६ भुकेला ७ आपल्या शक्तीप्रमाणें ८ जीभ ९ इच्छा १० संकट ११ स्वतःच्या कामापेक्षां १२ मनांत.

मरोन कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ॥ ८ ॥
मन भलतीकडे धांवें । तें विवेकें आवरावें ।
इंद्रियें दमन करावें । तो सत्वगुण ॥ ९ ॥
आतां असो हें बोलणें बहुत । देवीं धर्मीं ज्याचें चित्त ।
भजे जो कामनारहित । तो सत्वगुण ॥ १० ॥

**दशक ३ रा.**

**( १० ) माता.**

बालपण क्षणभरी मातेस न देखे ।
तरी आक्रंदे रुदन[1] करी दुःखें ।
ते समयीं मातेसारखें । आणीक कांहींच नाहीं ॥ १ ॥
जरी ब्रह्मादिक आले । अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें ।
तरी न वचे बुझाविलें[2] । आपले मातेवाचुनी ॥ २ ॥
कुरूप अथवा कुलक्षण । सकळाहुनी करंटेपण ॥
तरी नाहीं ती समान । भूमंडळीं कोणी ॥ ३ ॥

[ गरीबीमुळें मुलाबाळांच्या पोषणाकरितां बाहेरगावीं निघालेल्या मनुष्याच्या मनःस्थितीचें समर्थ वर्णन करितात.]

माया मात्रा[3] सिद्ध केली । कांहीं सामग्री[4] बांधली ।
लेकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्थ झाला ॥ १ ॥
तें समयीं माता आठवली । म्हणे धन्य ते माउली ।

---

१ रडे २ समजाविले ३ फराळाचें सामान ४ शिधा-सामान

ते समयीं[1] माता आठवली । ह्मणे धन्य ते माउली ।
मज कारणे बहुत कष्टली । परी मी नेणेचि मूर्ख ॥२॥
आज जरी ते असती । तरी मजला कदा न विसंबती[2] ।
वियोग होता आक्रंदती । तो पोटागि[3] वेगळाचि ॥३॥
पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी[4] ।
दगदगतां देखोन अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखवें ॥४॥
प्रपंच विचारें पाहतां । हें सकळ जोडे न जोडे माता ।
हें शरीर जयें[5] करितां । निर्माण झालें ॥ ५ ॥
लांव[6] तरी ते माया । काय कराव्या सहस्त्र जाया[7] ।
परी भुलोन गेलो वाया । मकरध्वजाचेनि[8] ॥ ६ ॥
या एका कामा कारणें । जिवलगासि द्वंद[9] घेणें ।
सर्वां तीच पिसुणें[10] । ऐसी वाटती ॥ ७ ॥
म्हणोनि धन्य धन्य ते प्रपंची जन ।
जे माय बापाचें भजन ।
करिती न करिती मन । निष्ठूर जिवलगासी ॥ ८ ॥
संगती स्त्री बालकाची । आहे साठीं जन्माची ।
परी माय बापेंकैची । मिळतील पुढें ॥ ९ ॥

---

१ वेळीं २ विसरती ३ पोटाची आग—कळवळा ४ स्वीकारी
५ जिच्यापासून ६ डांकीण ७ बायका ८ मदन ९ भांडण १० दुष्ट

## (११) मृत्यु.

संसार ह्मणजे सवेंच[1] स्वार[2] । नाहीं मरणास उधार ।
मापीं[3] लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥
सरतां संचिताचें[4] शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष[5] । जावें लागें ॥ २ ॥
होतां मृत्युचि आटाटी[6] । कोणी घालू न सकती पाठी
सर्वत्रास कुटाकुटी । मागें पुढें होतसें ॥ ३ ॥
मृत्यु काळ काठी निकी[7] । बैसे बळियाचे मस्तकीं ।
महाराजे बळिये लोकीं । राहो न सकती ॥ ४ ॥
मृत्यु न ह्मणे बलाढ्य । मृत्यु न ह्मणे हा धनाढ्य ।
मृत्यु न म्हणे आढ्य[8] । सर्व गुणें ॥ ५ ॥
मृत्यु न म्हणे हा भूपति । मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती ।
मृत्य न म्हणे हा करामती । कैवाड[9] जाणें ॥ ६ ॥
चारीखाणी[10] चारीवाणी[11] । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितके प्राणी । मृत्यु पावती ॥ ७ ॥
मृत्यु भेणें[12] पळो जातां । तरी मृत्यु न सोडीना सर्वथा ।

---

१ जन्मा बरोबर  २ घोड्यावरचा दूत  ३ प्रत्येक घटकेन शरीराला माप लागले आहे व ते कमी होत आहे  ४ प्रारब्ध ५ क्षण ६ गडबड  ७ खरोखरची  ८ युक्त  ९ नानाप्रकारच्या १० चार खाणी-- जरायुज, स्वेदज, अंडज, व उद्भिज ११ चार-वाणी परा पश्यंती मध्यमा. वैखरी. १२ भीतीनें.

मृत्यूस न ये चुकवितां । कांहीं केल्या ॥ ८ ॥
गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत विक्रमाचे[1] ।
गेले बहुत आटोपाचें[2] । कार्यकर्ते ॥ ९ ॥
असो ऐसें सकळही गेले । परंतु एकचि राहिले ।
जे स्वरूपाकार[3] झाले । आत्मज्ञानी ॥ १० ॥

### (१२) भाव.

भगवंत भावाचा[4] भुकेला । भावार्थ[5] देखोन भुलला ।
संकटीं पावें भाविकाला । रक्षितसें ॥ १ ॥
जयास भगवंत आवडे । तयाचें देवासी सांकडे[6] ।
संसार दुःख सकळ उडे । निजदासाचें ॥ २ ॥
जे अंकित[7] ईश्वराचें । तयास सोहळे[8] निज सुखाचे
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥ ३ ॥
जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी ।
जाणे भाव अंतर-साक्षी । प्राणिमात्रांचा ॥ ४ ॥
जरी भाव असेल मायिक[9] । तरी देव होय महाठक
नवल तयाचे कौतुक । जैशास तैसा ॥ ५ ॥
जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ।
भाव होता किंचित न्यून[10] । आपण ही दुरावे[11] ॥६॥

---

१ पराक्रमाचे २ उरकाचें ३ परब्रह्ममय ४ भक्तीचा ५. भक्ति, संकट ७ दास ८ आनंद ९ खोटा १० कमी ११ दूर होतेः.

जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव झाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसाचि बोळे[1] ॥ ७ ॥
भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन झाले ।
भावार्थबळें उद्धरिलें । पूर्वज तेहीं ॥ ८ ॥
आपण स्वयें तरले । जनासही उपेगा[2] आले ।
कीर्तिश्रवणे झाले । अभक्त भावार्थी ॥ ९ ॥

## (१३) भजन महिमा.

धन्य तयांची जननी । जे लागले हरीभजनीं ।
तेहींच एक जन्म जनीं । सार्थक केला ॥ १ ॥
बहुतां जन्माचे शेवटीं । जेणें चुके अटाटी[3] ।
तो हा नरदेह, भेटी । करी भगवंतीं ॥ २ ॥
म्हणोनी धन्य ते भाविक जन ।
जेहीं जोडिलें हरी निधान[4] ।
अनंत जन्मांतरींचें पुण्य । फळासी आलें ॥ ३ ॥
आयुष्य हेंचि रत्नपेटी । माजी भजन रत्नें गोमटीं[5] ।
ईश्वरीं अर्पुनिया लुटी । आनंदाची करावी ॥ ४ ॥

---

१ प्रसन्न होतो २ उपयोगा ३ यातायात ४ ठेवा ५ चांगली.

धरूनि ईश्वराची कास । केली संसाराची निरास[1] ।
तया भाविका जगदीश । सबाह्य संभाळी ॥ ५ ॥
जो अन्न देतो उदरासी[2] । शरीर विकावे लागे त्यासी ।
मां[3] जेणें घातले जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ६ ॥
अहर्निशीं[4] ज्या भगवंता । सकळ जिवांची लागली चिंता ।
मेघ वर्षे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ७ ॥
ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचे लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळूपणें ॥ ८ ॥
सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषय चिंतन ।
त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी ॥ ९ ॥
जयासी वाटे सुखचि असावें ।
तेणें रघुनाथ भजनीं लागावें ।
स्वजन सकळहीं त्यागावे । दुःखमूळ जे ॥ १० ॥

## दशक ४ था.

### (२४) नाम महिमा.

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ १ ॥

---

१ त्याग २ पोटासी ३ मग ४ अहोरात्र-रात्रंदिवस.

सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ।
नामस्मरणेंविण सर्वथा । राहोच नये ॥ २ ॥
चालतां बोलतां धंदा करितां। खातां जेवतां सुखी होतां।
नाना उपभोग घेतां । नाम विसरों नये ॥ ३ ॥
आधीं अवदशा[1] मग दशा[2] ।
अथवा दशेउपरी अवदशा ।
प्रसंग असो भलतैसा[3] । परंतु नाम सोडूं नये ॥ ४ ॥
बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृद्धापकाळीं ।
सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ ५ ॥
चहूं वर्ण नामाधिकार । नामीं नाहीं लहान थोर ।
जड मूढ पैलपार । पावती नामें ॥ ६ ॥

## दशक ५ वा.

### (१५) सद्गुरु लक्षण.

जे करामती[4] दाखविती । तेही गुरु ह्मणिजेती ।
परंतु सद्गुरु नव्हती । मोक्षदाते ॥ १ ॥
जे यातीचा[5] जो व्यापार । शिकविती भराया उदर ।
तेही गुरु परी साचार[6] । सद्गुरु नव्हेती ॥ २ ॥

---

१ दुःस्थिती, विपत्काळ २ सुस्थिती ३ विपरीत ४ चातुर्य-कौशल्य ५ जातीचा ६ खरोखर.

आपली माता आणि पिता । तेही गुरुचि तत्वता ।
परी पैलपार[1] पाववीता । तो सद्गुरु वेगळा ।। ३ ।।
प्राणी मायाजाळीं पडिले । संसार दुःखें दुखवले ।
ऐसें जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ।। ४ ।।
वासना-नदी-महापुरी । प्राणी बुडता ग्लांती[2] करी ।
तेथें उडी घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ।। ५ ।।
शिष्यास न लाविती साधन । न कराविती इंद्रियदमन
ऐसें गुरु अडक्याचे[3] तीन । मिळाले तरी त्यजावे[4] ।।६।।
जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी ।
इंद्रियदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ।। ७ ।।
अद्वैत निरूपणें अगाध वक्ता । परी विषयीं लोलंगता[5] ।
ऐसीया गुरुचेनि सार्थकता । होणार नाहीं ।। ८ ।।
निःशेष[6] दुराशा[7] तुटे । तरीच भगवंत भेटे ।
दुराशा धरिती वोखटे[8] । शद्बज्ञाते कामिक ।। ९ ।।
मुख्य सद्गुरुचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ[9] ज्ञान ।
निश्चयोच समाधान । स्वरूप स्थिती ।। १० ।।
याही वरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ।

---

१ पलीकडचे तीर २ दुःख ३ पैशाचे ४ टाकावे ५. आसक्ति. ६ गर्व ७ दुष्ट आशा ८ वाईट ९ शुद्ध.

विशेष आचारें निर्मळ । स्वधर्म विषयीं ॥ ११ ॥
जाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ।
कर्मेंविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ १२ ॥
म्हणोनी ज्ञान वैराग्य आणि भजन ।
स्वधर्म कर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याय मर्यादा ॥ १३ ॥
यामध्यें एक उणें असें । तेणें तें विलक्षण[1] दिसे ।
म्हणोन सर्वही विलसे[2] । सद्गुरूपासीं ॥ १४ ॥

## (१६) शिष्य लक्षण.

मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें[3] शरण । या नांव सच्छिष्य ॥ १ ॥
शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारशील ।
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ २ ॥
शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिष्मंत[4] ।
शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारीं ॥ ३ ॥
शिष्य पाहिजे साक्षपी[5] विशेष ।
शिष्य पाहिजे परम दक्ष[6] ।

---

१ न्यून -लक्षणरहित २ सिद्ध असते ३ एकनिष्ठेनें ४ शुद्ध-आचरणाचा ५ उद्योगी-साधनाभ्यास करणारा ६ सावध.

शिष्य पाहिजे अलक्ष्य[1] । लक्षी ऐसा ॥ ४ ॥
शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगमित्र ।
शिष्य असावा सत्पात्र[2] । सर्वगुणें ॥ ५ ॥
शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी ।
शिष्य पाहिजे अर्थांतरीं[3] । प्रवेशकर्ता ॥ ६ ॥
जो संसारदुःखें दुःखवला । जो त्रिविधतापें[4] पोळला
तोचि अधिकारी झाला । परमार्थविषयीं ॥ ७ ॥
बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणें[5] ।
संसारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ ८ ॥
जया संसाराचा त्रास । तयासीच उपजे विश्वास ।
विश्वासबळें दृढ कास[6] । धरिली सद्गुरुची ॥ ९ ॥
या कारणें दृढ विश्वास । तोचि जाणावा सच्छिष्य ।
मोक्षाधिकारी विशेष । अग्रगण्यु[7] ॥ १० ॥

(१७) ज्ञान.

जंव तें नाहीं प्रांजळ[8] । तंव सर्व कांहीं निर्फळ ।
ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ॥ १ ॥
भूत भविष्य वर्तमान । ठाऊक आहे परिच्छिन्न[9] ।

१ परब्रम्ह-जें दिसत नाहीं तें २ योग्य ३ अर्थ रहस्य जाणणार। ४ तीन प्रकारच्या तापानीं ५ ठसतो ६ आश्रय ७ श्रेष्ठ ८ शुद्ध ९ बरोबर, स्पष्ट.

यासीहि ह्मणिजे ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ॥ २ ॥
बहुत केलें विद्यापठण । संगीत शास्त्र राग ज्ञान ।
वैदिक शास्त्र वेदाध्ययन । हेंही ज्ञान नव्हे ॥ ३ ॥
नाना व्यवसायाचें[१] ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान ।
नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हें ॥ ४ ॥
नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा ।
नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हें ॥ ५ ॥
नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची[२] परीक्षा ।
नाना श्वापदांची[३] परीक्षा । हें ज्ञान नव्हें ॥ ६ ॥
नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा ।
नाना चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हें ॥ ७ ॥
नेमकचि[४] बोलणें । तत्काळ प्रतिवचन[५] देणें ।
शीघ्रचि[६] कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ॥ ८ ॥
आदिकरुनी चौसष्ट कळा । याहि वेगळ्या नाना कळा ।
चौदा विद्या सिद्धी सकळा । हें ज्ञान नव्हें ॥ ९ ॥
पोट भरावयाकारणें । नाना विद्याभ्यास करणें ।
त्यास ज्ञान ह्मणती परी तेणें । सार्थक नव्हे ॥ १० ॥

१ धंद्याचे २ हत्तींची ३ सिंह व्याघ्रादि हिंस्र पशूंची ४नेमस्त-नियमित ५ उत्तर ६ लवकर - तावडतोब

एवं पोट भरावयाची विद्या ।
तयेसी ह्मणो नये सद्विद्या ।
सर्व वस्तु व्यापक सद्या[1] । पाविजे तें ज्ञान ॥ ११॥
असो सकळ कलाप्रविण । विद्यामात्र परिपूर्ण ॥
तरी ते कौशलता[2] परी ज्ञान । ह्मणोचि नये ॥१२॥
जाणावें दुसऱ्याच्या जीवीचे[3] । हें ज्ञान वाटे साचे[4] ।
परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ॥ १३ ॥
बहुत प्रकारिचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें[5] ।
सायुज्यप्राप्ति[6] होय जेणें । तें ज्ञान वेगळें ॥ १४ ॥

(१८) शुद्धज्ञान

ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान ॥ १ ॥
मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप ओळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ २ ॥
जेथें दृश्य प्रकृति[7] सरे । पंचभूतिक वोसरे[8] ।
समूळ[9] द्वैत निवारे । या नांव ज्ञान ॥ ३ ॥
मन बुद्धि अगोचर । न कळे तर्काचा विचार ।

---

१ तत्काळ २ चातुर्य ३ अंतःकरणाचें ४ खरें ५ असामान्य-श्रेष्ठ ६ मोक्ष ७ जग-सृष्टी ८ नाहींसे होतें ९ मुळासह संपूर्ण.

उल्लेख[1] परेहूनि[2] पर[3] । या नांव ज्ञान ॥ ४ ॥
जेथें नाहीं दृश्य भान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ५ ॥
सर्व साक्षिणी अवस्था तुर्या[4] । ज्ञान ऐसें ह्मणती तया ।
परी ते जाणिजे वायां । पदार्थज्ञान ॥ ६ ॥
दृश्य पदार्थ ओळखिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान ॥ ७ ॥

(१९) बद्ध.

न कळे भक्ति न कळे ज्ञान ।
न कळे वैराग्य न कळे ध्यान ।
न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ॥ १ ॥
जयास नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धांचें लक्षण ।
तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ॥ २ ॥
दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मैत्री नाहीं ।
शांती नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ॥ ३ ॥
नेत्रीं द्रव्य दारा[5] पहावी । श्रवणीं[6] द्रव्यदारा ऐकावी ।
चिंतनीं द्रव्यदारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ ४ ॥

---

१ असा उल्लेख आहे-असें ग्रंथांत म्हटलें आहे २ पराविपेक्षां पलीकडे ३ पलीकडे ४ शेवटची चवथी ५ बायको ६ श्रवणेंद्रियानें-कानानें

व्यर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ ।
कथा वार्ता तेचि सकळ । या नांव बद्ध ॥ ५ ॥

### (२०) मुमुक्षु

संसारदुःखें दुखवला । त्रिविधतापें पोळला ।
निरूपणें पस्तावला । अंतर्यामीं[1] ॥ १ ॥
झाला प्रपंची उदास । मनें घेतला विषयत्रास[2] ।
ह्मणे आतां पुरे सोस । संसारीचा ॥ २ ॥
ऐसा पोटीं पस्तावला । निरूपणें पालटला ।
तोचि मुमुक्षु बोलिला । ग्रंथांतरीं ॥ ३ ॥
पुण्य मार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी ।
विरक्त झाला संसारीं । या नांव मुमुक्षु ॥ ४ ॥
स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास[3] धरिला परमार्थाचा ।
अंकित होईन सज्जनाचा । म्हणे या नांव मुमुक्षु ॥५॥

### (२१) साधक

अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग ।
तयासि बोलिजे मग । साधक ऐसा ॥ १ ॥
उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।
दृढते कारणें करी साधन । या नांव साधक ॥ २ ॥

---

१ अंतःकरणांत २ त्रास ३ नाद.

देहबुद्धि[1] विवेकें वारी[2] । आत्मबुद्धि सदृढ धरी ।
श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ ३॥

असत्क्रिया[3] ते सोडिली । आणि सत्क्रिया[4] ते वाढविली ।
स्वरूपस्थिती बळावली । या नांव साधक ॥ ४ ॥

कामापासून सुटला । क्रोधापासून पळाला ।
मदमत्सर सांडिला । एकीकडे ॥ ५ ॥

## (२२) सिद्ध-साधु-लक्षण

सदा स्वरूपानुसंधान[5] । मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जना वेगळा ॥ १ ॥

बाह्य[6] साधकाचे परी[7] । स्वरूपाकार अंतरीं[8] ।
सिद्धलक्षण चतुरीं । जाणिजे ऐसें ॥ २ ॥

संदेहरहित साधन । तेंचि सिद्धाचें लक्षण ।
अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसे ॥ ३ ॥

## (२३) संत-साधु

चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।
तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ॥ १ ॥

---

१ मी देह आहे अशी अहंकार बुद्धि २ दूर करी ३ वाईट आचरण ४ चांगलें ५ परब्रह्म स्वरूपाचें ठिकाणीं एकाग्रता ६ बाहेर ७ सारखा ८ अंतःकरणांत.

जो जनामध्यें वागे । परी जनाविगळी गोष्टी सांगे ।
ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ॥ २ ॥

(२४) गुणमहिमा

पृथ्वीमध्यें लोक सकळ । एक संपन्न एक दुर्बळ ।
एक निर्मळ एक वोंगळ । काय निमित्त ॥ १ ॥
कितीएक राजे नांदती । कितीएक दरिद्र भोगिती ।
कितीएकांची उत्तम स्थिती । कितीएक अधमाधम ॥२॥
हे सकळ गुणापाशीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।
अवगुणासी दरिद्रप्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं ॥ ३ ॥
जाणतां तो कार्य करी । नेणतां कांहींच न करी ।
जाणतां तो पोटभरी । नेणतां भीक मागें ॥ ४ ॥
हे तों प्रगटची असे । जनीं पाहतां प्रत्यक्ष दिसे ।
विद्येविण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ॥ ५ ॥
विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं ।
कुशलता नाहीं व्याप नाहीं । म्हणोन प्राणी करंटा॥६॥
इतुकेंही जेथें असे । तेथें वैभवास उणें नसे ।
वैभव सोडितां अपैसे । पाठी लागे ॥ ७ ॥
पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ ।
गुण नसतां जिणें व्यर्थ । प्राणिमात्रांचें ॥ ८ ॥
या कारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण ।

लक्षणेंविण अवलक्षण । सहजचि झालें ॥ ९ ॥
जनामध्यें जो जाणता । त्यास आहे मान्यता ।
कोणी एक विद्या असतां । महत्व पावे ॥ १० ॥
प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ ।
नेणता जाणिजे व्यर्थ । निःकारण ॥ ११ ॥
आपुलें स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना ।
ज्ञान नेणता अज्ञाना । अधोगती ॥ १२ ॥
न जाणतां कोटीवरी[1] । साधनें केलीं परोपरी ।
तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ॥ १३ ॥
जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंग वर्ते तदनंतर ।
भाग्य वैभव अपार । तेणें पावे ॥ १४ ॥
ह्मणोन जाणणें नव्हे सामान्य । जाणता होईजे सर्वमान्य ।
कांहींच नेणतां अमान्य । सर्वत्र करिती ॥ १५ ॥
जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म ।
सकळ कांहीं धर्माधर्म । जाणता कळे ॥ १६ ॥
नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण ।
नेणतां कठिण वर्तमान । सर्वत्रास होय ॥ १७ ॥

---

१ कोट्यावधी, असंख्य.

### (२९) निःकामभजन

निर्गुणीं ज्ञान झालें । क्षणोन सगुण अलक्ष केलें ।
तरी ते ज्ञाते नागवेले[1] । दोहिंकडे ॥ १ ॥
सांडील सगुण भजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेशी ।
म्हणोनियां सगुण भजनासी । सांडूं नये ॥ २ ॥
निःकाम बुद्धीचिया भजना । त्रैलोक्यीं नाहीं तुलना[2] ।
समर्थेंविण घडेना । निःकाम भजन ॥ ३ ॥
कामनेनें[3] फळ घडे । निःकाम भजनें भगवंत जोडे ।
फळ भगवंता कोणीकडे । महदंतर[4] ॥ ४ ॥
नाना फळे देवापाशीं । आणि फळ अंतरी[5] भगवंतासी ।
या कारणें परमेश्वरासी । निःकाम भजावें ॥ ५ ॥
निःकाम भजनाचें फळ आगळें ।
सामर्थ्य चढे मर्यादे वेगळें ।
तेथें बापुडीं[6] फळें । कोणीकडे ॥ ६ ॥
भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपणचि करावें ।
तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ॥ ७ ॥
दोनीं सामर्थ्यें एक होतां । काळास नाटोपे सर्वथा ।

---

१ लुटले गेले २ बरोबरी ३ फलाच्या इच्छेनें ४ मोठें अंतर
५ अंतर पाडी, दूर करी. ६ दीन.



20242

तथें इतरांची कोण कथा । कीटकन्यायें ॥ ८ ॥
ह्मणोन निःकाम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
तयास तुळितां त्रिभुवन । उणे वाटे ॥ ९ ॥
ह्मणोन सगुण भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
प्रत्ययाचें समाधान । दुर्लभ जगीं ॥ १० ॥

## (२६) उत्तम पुरुष.

आपण यथेष्ट[1] जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।
परंतु वाया दवडणें । हा धर्म[2] नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें ।
तरतेन[3] बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावें । ते बहुतांस सांगावें ।
वर्तल्याविण बोलावें । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥
स्नान संध्या देवार्चन । एकाग्र करावे जपध्यान ।
हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ॥ ४ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणें पडों नेदावें । कोणीएकाचें ॥ ५ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणिमात्रास मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ६ ॥

---

१ मनमानेल तसे, भरपूर २ न्याय, रीत ३ पोहणाऱ्यानें.

दुसऱ्यांचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ।
लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥ ७ ॥
आलस्य अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा ।
शब्द मत्सर न करावा । कोणीएकाचा ॥ ८ ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडोन बोलावा ।
सावधपणें करीत जावा । संसार आपुला ॥ ९ ॥
मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ।
मरोन कीर्तीस उरवावे । येणें प्रकारें ॥ १० ॥
नेमकपणें वर्तो लागला । तो बहुतांना कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ ११ ॥
उत्तम गुणें शृंगारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि एक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १२ ॥
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचे सोसीत जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें । नानाप्रकारें ॥ १३ ॥
कीर्ती पाहो जातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ती नाहीं ।
विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १४ ॥
कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ।
तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्त ॥ १५ ॥
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ।
तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ १६ ॥

आमची प्रतिज्ञा ऐशी । कांहीं न मागावें शिष्यासी ।
आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ १७ ॥
या कारणें समुदाव । झाला पाहिजे महोत्सव ।
हातोपातीं[1] देवाधिदेव । वोळेसा[2] करावा ॥ १८ ॥
आतां समुदाया कारणें । पाहिजेत दोनी लक्षणें ।
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ १९ ॥
जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ती ।
बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ २० ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाण । मानिती जनीं ॥ २१ ॥
जें जें जनास मानेना । तें तें जनही मानेना ।
आपण एकला जन नाना । सृष्टीमध्यें ॥ २२ ॥
ह्मणोन सांगातीं[3] असावें । मानत मानत शिकवावें ।
हळु हळु शेवटा न्यावें । विवेकानें ॥ २३ ॥
नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें ।
विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंगारिजे ॥ २४ ॥
शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज ।
अंतरीं नसतां चातुर्यबीज । कदापि शोभा न पावें ॥२५

१ वरचेवर २ वोळणें = प्रसन्न होणें ३ सांगती.

समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना ।
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ २६ ॥
अति सर्वत्र वर्जावे । प्रसंग पाहोन चालावे ।
हट-निग्रहीं न पडावे । विवेकी पुरुषें ॥ २७ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ २८ ॥
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिसाचें माजलें बंड ।
या कारणें अखंड । सावधान असावें ॥ २९ ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंगप्रकार ।
परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ ३० ॥
यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ ३१ ॥
देव ब्राह्मण आचार विचार । कित्येक जनास आधार ।
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ ३२ ॥
इहलोक परलोक पाहणें । अखंड सावधान राहणें ।
बहुत जनाचें साहणें । देणें ईश्वराचें ॥ ३३ ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ ३४ ॥
उत्तम गुणाचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक ।

धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ ३५ ॥
सकळ गुणांमध्यें सार । तजविजा विवेक विचार ।
जेणें पाविजे पैलपार[1] । अरत्रपरत्रींचा[2] ॥ ३६ ॥

## (२७) भिक्षा.

भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ।
प्रतिग्रहा वेगळा झाला । भिक्षा मागतां ॥ १ ॥
संतासंत जे जन । तेथें कोरान्न[3] मागोन करी भोजन ।
तेणें केलें अमृतप्राशन । प्रतिदिनीं ॥ २ ॥
वार लावून बैसला । तरी तो पराधीन झाला ।
तैसीच नित्यावळीला[4] । स्वतंत्रता कैची ॥ ३ ॥
नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटन करावें ।
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ४ ॥
अखंड विद्येचा अभ्यास । तयास वाटेना परदेश ।
जिकडे तिकडे स्वदेश । भुवनत्रयीं ॥ ५ ॥
भिक्षा मागतां किरकों[5] नये । भिक्षा मागतां लाजों नये ।
भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमण करावें ॥ ६ ॥
भिक्षा म्हणजे कामधेनु । सदाफळ नव्हे सामान्यु ।
भिक्षेस करी जो अमान्यु । तो करंटा जोगी ॥ ७ ॥

---

१ पलीकडचा तीर २ इहलोक व परलोकाचा ३ कोरडे अन्न कोरडी भिक्षा ४ नित्यपंक्तीला ५ ओरडूं नये, किंकाळी फोडूं नये

भिक्षेनें ओळखी होती । भिक्षेनें श्रम चुकती ।
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ ८ ॥
भिक्षा म्हणजे निर्भय स्थिती । भिक्षेनें प्रगटे महंती ।
स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ॥ ९ ॥
पृथ्वीमध्यें देश नाना । फिरतां उपवासी मरेना ।
कोणेएके ठायीं जना । जड नव्हे ॥ १० ॥
भिक्षे ऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य ।
वैराग्य नसतां अभाग्य । एकदेशी ॥ ११ ॥

## ( २८ ) महापुरुष

जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासीं ।
धगधगीत पुण्यराशी । महापुरुष ॥ १ ॥
नम्रपणें पुसों जाणें । नेमस्त अर्थ सांगों जाणे ।
बोला ऐसे वर्तो जाणे । उत्तम क्रिया ॥ २ ॥
तो परोपकार करीतां गेला । पाहिजे तो ज्यालां त्याला ।
मग काय उणे तयाला । भूमंडळीं ॥ ३ ॥
बहुत जन वाट पाहे । वेळेस तत्काळ उभा राहे ।
उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी । ४ ॥
सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ।
अखंड कोणीएकाचें उणें । पडोंच नेदी ॥ ५ ॥
न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा ।

दरिद्रपणाची आपदा[1] । तेथें कैची ॥ ६ ॥
प्रपंची जाणें राजकारण । परमार्थी साकल्य[2] विवरण ।
सर्वांमध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ ७ ॥
मागें एक पुढें एक । ऐसा कदापी नाहीं दंडक ।
सर्वत्रांसी अलौकिक । तया पुरुषाची ॥ ८ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ।
अवघेचि सुखी असावे । अशी वासना ॥ ९ ॥
उदंड मुलें नाना परी । वडिलांचें मन अवघ्या वरी ।
तैसी अवघ्याची चिंता करी । महापुरुष ॥ १० ॥
जयास कोणाचें सोसेना । तयाची निःकांचन वासना ।
धिक्कारिल्या धिक्कारेना । तोचि महापुरुष ॥ ११ ॥
बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ।
धीर उदार गंभीर । महापुरुष ॥ १२ ॥

---

१ दुःख २ पूर्ण.



# भाग ९ वा.

## दासबोधांतर्गत सुभाषितें.

### उत्तरार्ध.

### प्रपंच-परमार्थ.

(१) आधीं प्रपंच करावा नेटका[1] ।
मग घ्यावें परमार्थ—विवेका ।
येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुह्मी कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुह्मी विवेकी ॥ २ ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला ।
तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैचा ॥ ३ ॥
परमार्थ सांडूनि प्रपंच करिसी ।
तरी तूं यम-यातना भोगिसी ।
अंतीं परम कष्टी होसी । यमयातनां भोगितां ॥ ४ ॥
संसारीं असतांच मुक्त । तोचि जाणावा संयुक्त[2] ।
अखंड करी युक्तायुक्त । विचारणा हें ॥ ५ ॥

१ उत्तमरीतीनें २ उत्तयोगी.

प्रपंचीं जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ६ ॥
म्हणोनी सावधपणें । प्रपंच परमार्थ साधणें ।
ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ ७ ॥
पर्णाळी[1] पाहोन उचलें । जीवसृष्टी[2] विवेकें चाले ।
आणि पुरुष होऊन भ्रमेल । यासी काय म्हणावें ॥८॥
म्हणोनी असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा ।
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ ९ ॥
सुखी असतो खबर्दार[3] । दुःखी होतो बेखबर[4] ।
ऐसा हा लौकिक विचार । दिसतचि आहे ॥ १० ॥
(२) नाना वेष नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ।
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥
देव ऋषी मुनी योगी । नाना तापसी वीतरागी ।
पितृ आदिंकरून विभागी । अतित अभ्यागत ॥ २ ॥
गृहस्थाश्रमीं निर्माण झाले ।
आपला आश्रम टाकून गेले ।
परंतु गृहस्थाश्रमीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ॥ ३ ॥

---

१ पानावरची आळी २ जगांतील सर्व जीव-जंतु ३ सावध
४ बेसावध.

या कारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम ।
परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया[1] ॥ ४ ॥
जेथें षट्कर्मं चालती । विध्युक्त[2] क्रिया आचरती ।
वाङ्माधुर्यें बोलती । प्राणिमात्रासीं ॥ ५ ॥
सर्व प्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीं एक ।
त्याहिमध्यें अलौकिक । भक्तिमार्ग ॥ ६ ॥
कायावाचे जीवें प्राणें । कष्ट भगवंताकारणें ।
मनें घेतलं धरणें[3] । भक्तिमार्गी ॥ ७ ॥
ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त ।
संसार सांडून झाला मुक्त । भगवंता कारणें ॥ ८ ॥
अंतरापासूस वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य ।
लोलंगते एवढें अभाग्य । आणीक नाहीं ॥ ९ ॥
ऐसी वृत्ति उदासीन । त्याहिवरी विशेष आत्मज्ञान ।
दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ १० ॥
(३) संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्य विवेक ।
इहलोक आणि परलोक । दोनी[4] साधिले ॥ १ ॥
मननशीळ लोकांपाशीं । अखंडदेव अहर्निशी ।

---

१ सर्व प्राण्यांवर दया २ शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ३ वैरा-ग्यविषयीं लगादा करणाऱ्याप्रमाणें चिकाटी : ४ प्रपंच व परमार्थ :

पाहतां त्याच्या पूर्वसंचिताशी । जोडा[1] नाहीं ॥ २ ॥
भल्याची महिमा ऐशी । जे सन्मार्ग दावी लोकांशीं ।
पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदावें ॥ ३ ॥
स्थूल सूक्ष्म[2] तत्व झाडा । पिंड ब्रह्मांडाचा निवाडा ।
प्रचीत पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ॥ ४ ॥
वेदांताचें पंचीकरण । अखंड तयाचें विवरण ।
महावाक्यें अंतःकरण । रहस्य पाहे ॥ ५ ॥
सत्संग आणि सच्छास्त्र श्रवण । अखंड होतसें विवरण ।
नाना सत्संग आणि उत्तमगुण । परोपकाराचें ॥ ६ ॥
जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मसंस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ ७ ॥
विशेष सारासार विचार । तेणें होय जगदुद्धार ।
संगत्यागें निरंतर । होऊन गेले ॥ ८ ॥
(४) न्यायें निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळवाणें ।
मळमळ करितां जेवणें । विहित[3] नव्हे ॥ १ ॥
बहुतीं विषय निंदिलें । आणि तेचि सेवित गेले ।
विषयत्यागें देह चाले । हें तों घडेना ॥ २ ॥

---

१ बरोबरी २ स्थूलतत्वें व सूक्ष्मतत्वें याहून आपण वेगळे आहों असा, तत्वांच्या निरासानें झालेला निश्चय ३ योग्य.

बोलणें एक चालणें एक । त्याचें नांव हीन विवेक ।
येणें करितां सकळ लोक । हांसों लागती ॥ ३ ॥
विषयत्यागेंविण तो कांहीं । परलोक तो प्राप्त नाहीं ।
ऐसें बोलणें ठायीं ठायीं । बरें पहा ॥ ४ ॥
प्रपंची खाती जेवितो । परमार्थी काय उपवास करिती ।
उभयतासारखे दिसती । विषयाविषयीं ॥ ५ ॥
देह चालतां विषय त्यागीं । ऐसा कोण आहे जगीं ।
याचा निर्वाह[1] मजलागीं । देवें निरोपावा ॥ ६ ॥
विषय अवघा त्यागावा । तरीच परमार्थ करावा ।
ऐसें पाहतां गोवा[2] । दिसतो कीं ॥ ७ ॥
वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग ।
प्रपंचत्यागें सर्व सांग[3] । परमार्थ घडे ॥ ८ ॥
मागें ज्ञानी होऊनि गेले । तेहीं बहुत कष्ट केले ।
तरी मग विख्यात झाले । भूमंडळीं ॥ ९ ॥
येर[4] मत्सर करितांच गेलीं । अन्न अन्न ह्मणतां मेली ।
कित्येक भ्रष्टलीं[5] । पोटासाठीं ॥ १० ॥
वैराग्य मुळींहून नाहीं । ज्ञान प्रत्ययाचें नाहीं ।

---

१ खरा प्रकार २ घोटाळा ३ यथासांग – पूर्ण ४ दुसरी ५. धर्मभ्रष्ट झाली.

शुचि आचार तोही नाहीं । भजन कैचें ॥ ११ ॥
मज नाहीं तुज साजेना[1] । हें तों अवघें ठाउकें आहे जना ।
खात्यास न खाते देखो शकेना । ऐसें आहे ॥१२॥
वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य ।
वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे ॥ १३ ॥
प्रत्ययज्ञानी वीतरागी । विवेक बळें सकळ त्यागी ।
तो जाणिजे महायोगी । ईश्वरी पुरुष ॥ १४ ॥
वैराग्यें करून भ्रष्टेना । ज्ञान भजन सांडीना ।
उत्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा ॥ १५ ॥
शबल[2] विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें ।
विषयत्यागाचीं लक्षणें । ओळखा ऐसीं ॥ १६ ॥
(५) बहुत जन्माचा शेवट । नरदेह सांपडे अवचट[3] ।
येथें वर्तावें चोखट[4] । नीतिन्यायें ॥ १ ॥
प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थ विवेक ।
जेणें करतां उभय लोक । संतुष्ट होती ॥ २ ॥
अग्नि गृहासी लागला । आणि सावकाश निजेला ।
तो कैसा ह्मणावा भला । आत्महत्यारा ॥ ३ ॥

---

१ शोभेना २ मिश्रित, निषिद्ध ३ अकस्मात ४ चांगल्या रीतीनें.

पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड झाला ।
यमयातनेचा झोला[1] । कठिण आहे ॥ ४ ॥
तरी आतां ऐसें न करावे । बहुत विवेकें वर्तावे ।
इहलोक परत्र साधावे । दोहींकडे ॥ ५ ॥
ज्याचा जो व्यापार । तेथें असावे खबर्दार ।
दुश्चितपणें तरी पोर । वेढा[2] लावी ॥ ६ ॥
एक सदेवपणाचें[3] लक्षण । रिकामा जावो नेदी क्षण ।
प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहा ॥ ७ ॥
कांहीं धर्मचर्चा पुराण । हरिकथा निरूपण ।
वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥ ८ ॥
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण[4] । परमार्थीं पंचीकरण[5] ।
महावाक्याचें विवरण । करितां सुटे ॥ ९ ॥
कर्म उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान ।
परमार्थाचें जें साधन । तेंचि ऐकत जावें ॥ १० ॥

**प्रयत्न**

(१) जनाचा लालची[6] स्वभाव । आरंभीच ह्मणती देव ।
ह्मणिजे मला कांहीं देव[7] । ऐशी वासना ॥ १ ॥
कांहींच भक्ति केली नसतां । आणि इच्छिती प्रसन्नता ।

---

१ झटका २ फसवी ३ भाग्याचें ४ सोनें ५ पंचमहाभूतांचें विशिष्ट मिश्रण ६ लोभी ७ देवो – द्यावें.

जैसें कांहींच सेवा न करितां । स्वामीस[1] मागती ॥२॥
कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।
केल्यावीण होत नाहीं । साध्य[2] जनीं ॥ ३ ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ।
कष्टाकडे चुकवितें । हीन जन ॥ ४ ॥
आधीं कष्टाचें दुःख सोसिती । तें पुढें सुखाचें फळ भोगिती
आधीं आळसें सुखावती । त्यासी पुढें दुःख ॥ ५ ॥
इहलोक अथवा परलोक । दोहिंकडे सारखाचि विवेक ।
दीर्घसूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ६ ॥
मेळविती तितुकें भक्षिती ।
ते कठीण काळीं मरोन जाती ।
दीर्घसूचनेनें वर्तती । तेचि भले ॥ ७ ॥
जेहिं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतच राहिले । करंटे जन ॥ ८ ॥
करंट्याचें करंट लक्षण । समजोन जाती विचक्षण ।
भल्याचें उत्तम लक्षण । करंट्यास कळेना ॥ ९ ॥
विचारें इहलोक परलोक । विचारें होतसें सार्थक ।
विचारें नित्यानित्य विवेक । पाहिला पाहिजे ॥१०॥

---

१ धन्यास  २ प्राप्त.

(२) दुर्बळ नाचारी[1] वोडगस्त ।
आळशी खादाड ऋणग्रस्त[2] ।
मूर्खपणें अवघे व्यस्त । कांहींच नाहीं ॥ १ ॥
खाया नाहीं जेवाया नाहीं । लेया[3] नाहीं नेसाया नाहीं ।
अंथराया नाहीं पांघराया नाहीं ।
कोपट[4] नाहीं अभागी ॥ २ ॥
सोयरे नाहीं धायरे[5] नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं ।
पाहतां कोठें ओळखी नाहीं । आश्रयेविण परदेशी ॥३॥
तेणें कैसें करावें । काय जीवेंसी धरावें ।
वाचावें कीं मरावें । कोण्याप्रकारें ॥ ४ ॥
लहान थोर काम कांहीं । केल्यावीण होत नाहीं ।
करंट्या सावध पाहीं । सदैव होसी ॥ ५ ॥
अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाकेना[6] पुरतां ।
सुख संतोषाची वार्ता । तेथें कैची ॥ ६ ॥
म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ७ ॥
सावधानता असावी । नीति मर्यादा राखावी ।

---

१ निराश्रित २ कर्जबाजारी ३ अंगावर घेण्यास ४ खोप
५ सोयरा धायरा = नात्याचा मनुष्य ६ होईना.

जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥ ८ ॥

## आळस

(३) साधन असोन उमजेना । श्रवण असोन ऐकेना ।
ज्ञान असोंन कळेना । सारासार विचार ॥ १ ॥
ऐसा जो दुश्चित आळसी । परलोक कैचा त्यासी ।
जयाचे जीवीं अहर्निशीं । आळस वसे ॥ २ ॥
आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार ।
आळसें नव्हे पाठांतर । कांहिं केल्या ॥ ३ ॥
आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण ।
आळसें परमार्थाची खूण । मळिण झाली ॥ ४ ॥
आळसें नित्य नेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला ।
आळसें आळस वाढला । असंभाव्य ॥ ५ ॥
आळसें गेली धारणा धृती ।
आळसें मळिण झाली वृत्ती ।
आळसें विवेकाची गती । मंद झाली ॥ ६ ॥
आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली ।
आळसें शून्याकार झाली । सुबुद्धि निश्चयाची ॥७॥
दुश्चितपणासवें आळस । आळसें निद्राविलास ।
निद्राविलासें केवळ नाश । आयुष्याचा ॥ ८ ॥
निद्रा आळस दुश्चितपण । हेंचि मूर्खाचें लक्षण ।

येणें करितां निरूपण । उमजेचिना ॥ ९ ॥

(४)आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे ।
मुख म्हणोन आवडे । आळस लोका ॥ १ ॥
साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुखावती ।
खाती जेवती सुखी होती । यत्नें करूनी ॥ २ ॥
आळस उदास नागवणा । आळस प्रयत्नबुडवणा ।
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ ३ ॥
म्हणोनी आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ ४ ॥

(५) नरदेह परम दुर्लभ । येणें घडे अलभ्य लाभ ।
दुर्लभ तें सुलभ । होत आहे ॥ १ ॥
वरकड देह हे काबाड । नरदेह मोठें घवाड ।
परंतु पाहिजे जाड । विवेक रचना ॥ २ ॥
येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला ।
देव नाहीं ओळखिला । विवेकबळें ॥ ३ ॥
नर तोचि नारायण । जरी प्रयत्नें करी श्रवण ।
मननशील अंतःकरण । सर्वकाळ ॥ ४ ॥
जेणें स्वयेंचि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें ।
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ ५ ॥

## विवेकवैराग्य

महद्भाग्य हातासी आलें । परी भोगूं नाहीं जाणितलें ।
तैसें वैराग्य उत्पन्न झालें । परी विवेक नाहीं ॥ १ ॥

नाना प्रपंचाच्या ओढी । नाना संकटें सांकडी ।
संसार सांडूनी देशधडी[1] । होय तेणें ॥ २ ॥

विवेकेंविण वैराग्य केलें ।
तरी अविवेकें अनर्थी घातलें ।
अवघें व्यर्थचि गेलें । दोहींकडे ॥ ३ ॥

ना प्रपंच ना परमार्थ । अवघे जिणेंचि झालें व्यर्थ ।
अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ४ ॥

का व्यर्थचि ज्ञान बडबडिला ।
परी वैराग्ययोग नाहीं घडिला ।
जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ॥ ५ ॥

वैराग्येंविण ज्ञान । तो व्यर्थचि साभिमान ।
लोभदंभें घोळसून । कासावीस केला ॥ ६ ॥

श्वान बांधलें तरी भुंके । तैसा स्वार्थीमुळें थिंके[2] ।
पराधीक[3] देखो न शके । साभिमानें ॥ ७ ॥

---

१ देशपार २ चरफडतो ३ दुसऱ्याचा उत्कर्ष.

हें एकेविण एक । तेणें उगाच वाढे शोक ।
आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ॥ ८ ॥
विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ।
अंतर्बाह्य मोकळा झाला । निःसंग योगी ॥ ९ ॥
जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सवें क्रिया चाले ।
दीक्षा देखोनी चकित झाले । शुचिष्मंत[1] ॥ १० ॥
विवेक वैराग्य तें ऐसें । नुसतें वैराग्य हेंकाड[2] पिसें ।
ब्रह्मज्ञान येळिलसें[3] । आपणचि वाटे ॥ ११ ॥
ह्मणोन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य ।
रामदास ह्मणे योग्य । साधु जाणती ॥ १२ ॥

### महंत

मूर्ख एकदेशी पहातो । चतुर सर्वत्र पहातो ।
जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥
ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।
पाहों जातां न सांपडावें । एकाएकी ॥ २ ॥
कीर्तिरुपें उदंड ख्यात । जाणती लहान थोर समस्त ।
वेष पाहतां शाश्वत । एकही नाहीं ॥ ३ ॥
अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करित जावा ।

---

१ सदाचरणी २ एककल्लीपणाचें वेड ३ कंटाळवाणें.

काळ सार्थकचि करावा । जना सहित ॥ ४ ॥
उत्तम गुण तितके घ्यावे । घेऊन जनास शिकवावें ।
उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपें ॥ ५ ॥
आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ ।
साक्षेपेंविण केवळ । वृथापुष्ट ॥ ६ ॥
लोक बहुत शोधावें । त्यांचे अधिकार जाणावें ।
जाण जाणोन धरावें । जवळीं दुरी ॥ ७ ॥
अधिकार परत्वें कार्य होतें ।
अधिकार नसतां व्यर्थ जातें ।
जाणोन शोधावीं चित्तें । नानाप्रकारें ॥ ८ ॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें ।
साक्षेप पाहोन विश्वास धरणें ।
आपला मगज[1] राखणें । कांहींतरी ॥ ९ ॥
महंतें महंत करावे । युक्ति बुद्धीनें भरावे ।
जाणते करून विखरावें[2] । नाना देशीं ॥ १० ॥

**निस्पृह.**

ऐका निस्पृहाची शिकवण । युक्ति बुद्धि शहाणपण ।
जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १ ॥

---

१ महत्व २ पसरावें

एके स्थळीं राहों नये । कानकोंडे साहो नये ।
द्रव्य दारा पाहों नये । आळकेपणें[1] ॥ २ ॥
भिक्षेसाठीं लाजो नये । बहुत भिक्षा घेऊं नये ।
पुसतां ही देऊं नये । ओळखी आपली ॥ ३ ॥
एक वेष धरूं नये । एक साज[2] करूं नये ।
एकदेशी होऊं नये । भ्रमण करावें ॥ ४ ॥
नित्यनेम सोडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये ।
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥ ५ ॥
आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगो नये ।
बहुसाल मागों नये । शिष्य-वर्गासी ॥ ६ ॥
सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये ।
कदा सुख मानूं । निसुगपणाचें[3] ॥ ७ ॥
नेणपण सोडूं नये । महंतपण सांडूं नये ।
द्रव्यासाठीं हिंडों नये । कीर्तन करीत ॥ ८ ॥
कोणास भर्वसा देऊं नये । जड भिक्षा मागों नये ।
भिक्षेसाठीं सांडूं नये । परंपरा आपुली ॥ ९ ॥
निस्पृहें अवघेंचि करावें ।
परी आपण तेथें न सांपडावें ।
परस्परें उभारावें । भक्ति मार्गासी ॥ १० ॥

---

१ अभिलाष बुद्धिनें २ वेष, अलंकार ३ आळसाचे.

## विवेक लक्षण.

जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा ।
जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती ॥ १ ॥
सृष्टीमध्यें उत्तम गुण । तितके चाले निरूपण ।
निरूपणावीण क्षण । रिकामा नाहीं ॥ २ ॥
प्रबंधाची पाठांतरें । उत्तरासी संगीत उत्तरें ।
नेमक बोलतां अंतरें । निवदी सकळासी ॥ ३ ॥
जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । बहुत जन ॥ ४ ॥
होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें ।
भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हें ॥ ५ ॥
जुन्या लोकांचा कंटाळा आला ।
तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला ।
जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ ६ ॥
धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।
नाना बुद्धी शक्ताला । ह्मणोन शिकवाव्या ॥ ७ ॥
व्याप होईल तों राहावें । व्याप राहतां उठोन जावें ।
आनंदरूप फिरावें । कोठेंतरी ॥ ८ ॥
कीर्ति पाहतां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं ।
केल्याविण कांहींच नाहीं । कोठेंतरी ॥ ९ ॥

# भाग १० वा.

## दासबोधांतर्गत संकीर्ण सुभाषितें.

पूर्ण ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुरभिमान । मत्सरें करी ॥ १ ॥
जयास भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ।
मत्सर धरी जो पुंसा[1] । तयास तें-चि प्राप्त ॥ २ ॥
व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित लोक ।
परी त्यांची पिल्लीं निःशंक[2] । तयापुढें खेळती ॥ ३ ॥
जन्म अवघा दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ[3] ।
ह्मणोनिया तत्काळ । स्वहित करावें ॥ ४ ॥
तैसा संसारें दुखवला । त्रिविध तापें पोळला ।
तोचि एक अधिकारी झाला । परमार्थासी ॥ ५ ॥
असो वक्तृत्वा अधिकार । अल्पास[4] न घडे प्रत्युत्तर ।
वक्ता पाहिजे साचार[5] । अनुभवाचा ॥ ६ ॥
मनें भगवंतास पुजावें । कल्पून सर्वही समर्पावें ।
मानस पूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ७ ॥

---

१ पुरुष २ निर्भयपणें ३ निखार ४ अल्प = ल्हान, साधारण मनुष्य ५ आचार शुद्ध.

साष्टांग नमस्कार अधिकारू । नाना प्रतिमा[1] देवगुरु।
अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा ॥ ८ ॥
जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरुचें अधिष्ठान[2] ।
या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ ९ ॥
परम अन्याय करून आला ।
आणि साष्टांग नमस्कार घातला ।
तरी तो अन्याय क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठी ॥ १० ॥
लक्ष भोजनीं पूज्य ब्राह्मण। अन्य यातीसि पुसें कोण ।
परी भगवंतासी भाव प्रमाण । येरा[3] चाड[4] नाहीं ॥ ११ ॥
जें जना वेगळें केलें । तें वेदें अव्हेरिलें[5] ।
ह्मणोनी तयास नाम ठेविलें । पाषांडमत ॥ १२ ॥
ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी सद्गुरु किमर्थ करावा ।
ऐसें ह्मणाल तरी निजठेवा । सद्गुरूवीण नाहीं ॥ १३ ॥
स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरूविण ।
ब्रह्मज्ञान नसतां शीण । जन्ममृत्यु चुकेना ॥ १४ ॥
जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा ।
सत्संगेंवीण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ १५ ॥

---

१ मूर्ति ( देवाच्या ) २ स्थान ३ दुसरी ४ आवड, गोडी ५ अनादर केलें.

असो जयास मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा ।
सद्गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ॥ १६ ॥
बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे ।
संसार दुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ १७ ॥
स्वामिद्रोह जया घडे । तो यावच्चंद्र नरकीं पडे ।
तयास उपायचि न घडे । स्वामी तुष्टल्या वांचुनी ॥ १८ ॥
स्वदुःखें झुरे अंतरीं । परदुःखें हास्य करी ।
तयास प्राप्त यमपुरी । यमदूत ताडिती ॥ १९ ॥
संसार-संगें सुख झालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें ।
ऐसें जाणोन अनहित केलें । ते दुःखी होती स्वयें ॥ २० ॥
संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती ।
जाणोन डोळे झांकिती । पढत मूर्ख ॥ २१ ॥
प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।
परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हें ॥ २२ ॥
सकळ तीर्थांची संगती । स्नान दानाची फळश्रुती ।
त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणें ॥ २३ ॥
ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन ।
जया पुरुषास जें ध्यान । तयास तेंचि प्राप्त ॥ २४ ॥
जेणें संसारीं घातलें । अवघें ब्रह्मांड निर्माण केलें ॥
त्यासी नाहीं ओळखिलें । तोचि पतित ॥ २४ ॥

दृष्टीस पडली सवे[1] । जें दिसेल तेंचि पहावें ॥
परंतु गुज[2] तें जाणावें । गोप्य[3] आहे ॥ २५ ॥
देहबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला ॥
देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ २६
उसामध्यें घेइजे रस । येर तें सांडिजे बाकस ॥
तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें ओळखावा ॥२७ ॥
जयासि झालें आत्मज्ञान । तेचि थोर महाजन ॥
वेदशास्त्रं पुराणें । साधूजन बोलताती ॥ २८ ॥
करिती ब्रह्म-निरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ॥
तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ २९ ॥
सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासार विचारें । संतसंगें ॥ ३० ॥
साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारखें व्हावें ।
आणि देवास न मानावें । हें कोण ज्ञान ॥ ४१ ॥
मनीं धरावें ते होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें ।
कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत[4] येतें ॥ ३२ ॥
रघुनाथ स्मरोनि कार्य करावें ।
तें तत्काळचि सिद्धि पावें ।

---

१ संचय २ ब्रह्म ३ गुप्त ४ अनुभव.

कर्ता राम हें असावे । अभ्यंतरी ॥ ३३ ॥
मी कर्ता ऐसें ह्मणसी । तेणें तूं कष्टी होसी ।
राम कर्ता ह्मणतां पावसी । यश कीर्ति प्रताप ॥३४॥
मी कोण हें जाणावें । मीपण त्यागूनि अनन्य व्हावे ।
मग समाधान तें स्वभावें । अंगीं बाणें ॥ ३५ ॥
जयांस आहे विचार । ते सुखासनीं झाले स्वार ।
इतर ते जवळील भार । वाहतांचि गेले ॥ ३६ ॥
दिसेना जें गुप्त धन । तयास करणें लागे अंजन ।
गुप्त परमात्मा, सज्जन । संगतीं शोधावा ॥ ३७ ॥
रायाचे[1] सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु[2] लाभे ॥ ३८ ॥
संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधी न सांडितां ।
जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥ ३९ ॥
हें प्रचितीचें बोलणें । विवेक प्रचीत पहाणें ।
प्रचीत पाहे ते शहाणे । अन्यथा नव्हे ॥ ४० ॥
येचि जन्में येणेंचि काळे । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ४१ ॥
दृढ करूनिया बुद्धि । आधीं घ्यावी आपशुद्धी[3] ।

१ राजाचे २ ब्रह्म. ३ आपण कोण याचा शोध

तेणें लागे समाधी । अकस्मात ॥ ४२ ॥
जेथें मुरालें मीपण । तेचि अनुभवाची खूण ।
अनिर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ॥ ४३ ॥
मुसा करितां[1] धान्य निपजे ।
धान्य घेऊन भुसा टाकिजे ।
तैसें शद्ब भूस जाणिजे । अर्थ धान्य ॥ ४४ ॥
भूस सांडून कण[2] घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा ।
कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ॥ ४५ ॥
आहांच[3] सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण ।
द्रव्य घ्यावें साठवण । पाहोंच नये ॥ ४६ ॥
तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचीत ।
अध्यात्म लाभे अकस्मात । तरी घ्यावें ॥ ४७ ॥
व्यवसायीं[4] जो मळिण । त्यासी न कळे निरूपण ।
येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसी ॥ ४८ ॥
मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे ।
अज्ञान गेलिया पाविजे । परब्रह्म तें ॥ ४९ ॥
ब्राह्मणाचें ब्रम्ह तें सोंवळें । शूद्राचें ब्रम्ह तें ओंवळें ।

---

१ भुसापासून २ दाणा ३ आपोआप – श्रम न करितां
४ उद्योगांत.

ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ॥ ५० ॥
वृत्ति रहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान ।
जेथें तुटे अनुसंधान[1] । माया ब्रम्हींचें ॥ ५१ ॥
ऐकिल्यावीण कळेना । हें ठाऊक आहे जना ।
या कारणें मूळ प्रयत्ना । श्रवण आधीं ॥ ५२ ॥
तीर्थव्रतांची फलश्रुती[2] । पुढें होणार सांगती ।
तैसें नव्हे हातीच्या हातीं । सप्रचित श्रवण ॥५३॥
नाना रोग नाना व्याधी । तत्काळ तोडिजे औषधी ।
तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ॥ ५४ ॥
या नांव बोलिजे मनन । अर्थालागीं सावधान ।
निजध्यासें समाधान । होतसे ॥ ५५ ॥
सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें ॥ ५६ ॥
आवडीसारखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे ।
नाहीं तरी कंटाळे । मानस, ऐकतां ॥ ५७ ॥
ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार ।
जेथ पडे तेंचि सार । पुण्य भूमी ॥ ५८ ॥
साधुदर्शनें पावन तीर्थें । पुरती त्यांचे मनोरथ ।

---

१ संबंध २ कर्माचें फळ.

साधू न येतां जिणें[1] व्यर्थ। तया पुण्य क्षेत्राचें॥५९॥
पुण्य नदीचे जें तीर। तेथेंचि पडावें शरीर।
हा इतर जनांचा विचार। साधू नित्य मुक्त॥ ६०॥
दिधल्याविण[2] पाविजेना। पेरिल्याविण उगवेना।
ऐसें हें वाक्य जना। ठाउकेंचि आहे॥ ६१॥
जितां नाहीं भगवद्भक्ती। मेल्या कैंची होईल मुक्ती।
असो जे जे जैसें करिती। ते ते पावती तैसेंचि॥६२
जे कां जीवन्मुक्त ज्ञानी। त्यांचें शरीर पडो रानीं।
अथवा पडो स्मशानीं। तरी धन्य झाले॥ ६३॥
साधुचा देह खितपला[3]। अथवा श्वानादिकीं भक्षिला।
हें प्रशस्त न वाटे मनाला। मंद बुद्धीस्तव॥ ६४॥
शरणांगतांची वाहे चिंता। तो एक सद्गुरु दाता।
जैसें बाळक वाढवी माता। नाना यत्नें करूनी॥६५॥
चारी खाणी चारी वाणी। चौऱ्यांशी लक्ष जीव योनी।
ज्याणें निर्मिले लोक तीनी। तया नांव देव॥ ६६॥
उल्हाऱ्याचा उठोनि देव। करूं नेणें सर्व जीव।
तयाचेनि ब्रह्म कटाव[4]। निर्मिला[5] न वचे॥ ६७॥

---

१ जगणें २ दिल्याविण ३ क्षीण होत गेला ४ ब्रह्मांड
५ निर्माण करितां येत नाहीं.

उपजणें आणि मरणें । येणें जाणें दुःख भोगणें ।
हें त्या देवाचें करणें । तो कारण वेगळा ॥ ६८ ॥
अर्थांतर[1] पाहिल्याविण । उगीच करी जो श्रवण ।
तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ॥ ६९ ॥
ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा ।
पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें ॥ ७० ॥
पापाचें फळ तें दुःख । आणि पुण्याचें फळ तें सुख ।
पापपुण्य आवश्यक । भोगणें लागे ॥ ७१ ॥
नरदेहीं ज्ञानेंविण । कदा न चुके जन्ममरण ।
भोगणें लागे दारुण । नाना नीच योनी ॥ ७२ ॥
हा नरदेह पडतां । तोचि पाविजे मागुता ।
ऐसा विश्वास धरतां । लाज नाहीं ॥ ७३ ॥
विवेक पाहिल्याविण । जो जो उपाव तो तो शिण ।
विवेक पाहतां आपण । आत्माच असें ॥ ७४ ॥
आपणास निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती ।
तयांस परमात्मा मुक्ति । तत्काळ देतो ॥ ७५ ॥
आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेदभक्ती ।
तये नांव सायुज्यमुक्ती । सत्य जाणावी ॥ ७६ ॥

---

१ श्रेष्ठ, अधिक

योगी ओळखावा योगेश्वरें। ज्ञानी ओळखावा ज्ञानेश्वरें।
महाचतुर तो चतुरें। ओळखावा ॥ ७७ ॥

मध्यान्हीं[1] थुंकतां सूर्यावरी।
तो थुंका पडे आपणाच वरी।
दुसऱ्यास चिंतितां अंतरीं। आपणास घडे ॥ ७८ ॥

प्रचीतिनिश्चयापुढें अनुमान। जैसें सिंहापुढें आलें श्वान।
खऱ्यापुढें खोटें प्रमाण। होईल कैसें ॥ ७९ ॥

जितुकें अनुमानाचें बोलणें। तितुकें वमनप्राय त्यागणें।
निश्चयात्मक तेंचि बोलणें। प्रत्ययाचें ॥ ८० ॥

प्रयत्नेंविण कार्य झालें। जेविल्याविण पोट भरलें।
ज्ञानेंविण मुक्त झालें। हें तों घडेना ॥ ८१ ॥

नेणें दुसऱ्याची तळमळ। तें मनुष्य परदुःखशीतळ।
तैसाच हा ही केवळ। अनुभव जाणावा ॥ ८२ ॥

सागरामध्यें खसखस। तैसें परब्रह्मीं दृश्य।
मतीसारखा मतिप्रकाश। अंतरीं बाढे ॥ ८३ ॥

बाह्यात्कार केला अधिक। परी तो अवघा लौकिक।
येथें पाहिजे मुख्य एक। अंतर्निष्ठा ॥ ८४ ॥

लौकिक बरा संपादिला।
परी अंतरीं सावध नाहीं झाला।

---

१ भर दोनप्रहरीं

मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ॥ ८५ ॥
प्रचीतीवीण वैद्य म्हणवी । उगीच करी उठाठेवी ।
तया मूर्खाला गोवी । प्राणीमात्र ॥ ८६ ॥
प्रत्यक्षास आणी प्रमाण । निश्चयास आणी अनुमान ।
मार्ग देखोन आडरान । घेऊंच नये ॥ ८७ ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ही विष्णूचे अवतार ।
अभक्त दुर्जन रजनीचर । सहजचि झाले ॥ ८८ ॥
वहुत श्रमिष्ट मिळाले । त्यांत उमजल्याचें काय चाले ।
सृष्टीमध्यें उमजले । ऐसे थोडे ॥ ८९ ॥
प्रचीतिवीण औषध घेणें । प्रचीति नसतां पथ्य करणें ।
प्रचीतिवीण ज्ञान सांगणें । या नांव श्रम ॥ ९० ॥
प्रचीतिवीण औषध घेणें । तरी मग घडचि[1] विघडणें[2] ।
अनुमानें जें कार्य करणें । तें मूर्खपण ॥ ९१ ॥
म्हणोन अनमानाचें कार्य । भल्यानें करूं नये ।
उपाय पाहतां अपाय । नेमस्त घडे ॥ ९२ ॥
शोधिल्याविण अन्न वस्त्र घेणें । तेणें प्राणास मुकणें ।
लटिक्याचा विश्वास धरणें । हें मूर्खपण ॥ ९३ ॥
वैद्य पाहिला तरी कच्चा । तरी प्राण गेला पोराचा ।

---

१ चांगलें असलेलें २ नाश करणें.

येथें उपाय दुसऱ्याचा । काय चाले ॥ ९४ ॥
दुःखें अंतरीं झिजे । आणि वैद्य पूसतां लाजे ।
तरी मग त्यासी साजे[1] । आत्महत्यारेपण ॥ ९५ ॥
विचार न करितां जें जें केलें ।
तें तें वाउगें व्यर्थ गेलें ।
म्हणोनि विचारीं प्रवर्तले । पाहिजे आधीं ॥ ९६ ॥
विचार पाहेल तो पूरुषु । विचार न पाहेल तो पशु ।
ऐसी वचनें सर्वेशु[2] । ठायीं ठायीं बोलिला ॥ ९७ ॥
श्रवण मनन निजध्यास[3] ।
प्रचीतीनें बाणतां विश्वास ।
रोकडा साक्षात्कार, सायास । करणेंचि नलगे ॥९८॥
सत्याएवढे सुकृत नाहीं । असत्या एवढे पाप नाहीं।
प्रचीतीविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ ९९ ॥
पापाचें वळलें[4] शरीर । भाग्य घडे तदनंतर ।
अंतरीं रोग वरि वरि उपचार । काय करिती ॥१००॥
नाना क्षेत्रीं हें मुंडिलें । नाना तीर्थी हें दंडिलें ।
नाना निग्रहीं[5] खंडिलें[6] । ठायीं ठायीं ॥ १०१ ॥

---

१ भोगतें  २ भगवान  ३ निदिध्यास-सतत चिंतन  ४ बनलें
५ नियमांनीं ६ पीडिलें.

नाना मृत्तिकेनें घासिलें । अथवा तप्त मुद्रेनें डासिलें[1] ।
जरी हें वरिवरि तासिलें । तरी शुद्ध नव्हे ॥१०२॥
वेष वरिवरि केला । परी अंतरीं दोष भरला ।
त्या दोषाच्या दहनाला । आत्मज्ञान पाहिजे ॥१०३॥
नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटनें ।
सर्वांहुनी कोटिगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥१०४॥
श्रवणापरीस[2] मनन थोर । मननें कळे सारासार ।
निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ॥१०५॥
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥१०६॥
असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन ।
ह्मणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥ १०७ ॥
क्षीर[3] नीर[4] निवडती । ते राजहंस बोलिजेती ।
सारासार जाणती । ते महानुभाव[5] ॥ १०८ ॥
भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा ।
अवघा वंशचि उद्धरावा । हरिभक्ती करुनी ॥१०९॥
एक सुखी एक दुःखी । प्रत्यक्ष वर्तते लोकीं ।
कष्टी होऊनियां शेवीं[6] । प्रारब्धापरी चालिती ॥११०॥

१ डाग दिलें २ श्रवणापेक्षां ३ दूध ४ पाणी ५ श्रेष्ठ ६ शेवटीं.

अचुक यत्न करवेना । ह्मणोन केलें तें सजेना[1] ।
आपला अवगुण जाणेना । कांहीं केल्या ॥१११॥
लोकीं भले म्हणाया कारणें । भल्यास लागते सोसणें ।
न सोसितां भंडवाणें[2] । सहजचि होय ॥ ११२ ॥
जंवरी[3] चंदन झिजेना । तंवरी सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट[4] होती ॥११३॥
जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काय कळे ।
उत्तम गुण देखतां निवळे । जगदंतर ॥ ११४ ॥
जनीं जनार्दन वोळला । तरी काय उणे तयाला ।
राजी राखावें सकळाला । कठिण आहे ॥ ११५ ॥
कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेच आले आणि गेले ।
शहाणे होऊन भुलले । काय सांगावें ॥ ११६ ॥
येथील येथें अवघेंचि राहतें । ऐसें प्रत्ययास येतें ।
कोण काय घेऊन जातें । सांगाना कां ॥ ११७ ॥
राजा असतां मृत्यु झाला । लक्ष कोटी कबूल झाला ।
तरी सोडिना तयाला । मृत्यु कांहीं ॥ ११८ ॥
खोटें सांडून खरें घ्यावें । तरीच परीक्षवंत म्हणावें ।
असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें ॥ ११९ ॥

---

१ यशस्वी होत नाहीं २ त्रास-फजिती ३ जोपर्यंत ४ सारखे

एक शीत चांचपावें । म्हणजे वर्म पडे ठावें ।
तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ॥ १२० ॥
प्रत्ययास बोलिजे न्याय । अप्रत्यय तो अन्याय ।
जात्यंधासी परीक्षा काय । नाना रत्नांची ॥१२१॥
जैसा जैसा घडे संग । तैसें गुहराचे[1] रंग ।
या कारणें उत्तम मार्ग । शोधीत जावें ॥ १२२ ॥
विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ।
यांत मानेल तें आवश्यक । केलें पाहिजे ॥१२३॥
साखर माती पृथ्वी होय । परी ते माती खातां नये ।
गरळ[2] आप[3] नव्हे काय । परी तें खोटें ॥ १२४॥
मनुष्य आणि गधडें[4] । राजहंस आणि कोंबडें ।
राजे आणि माकडे । एक कैसीं ॥ १२५ ॥
या कारणें आचारशुद्ध । त्यांउपरी विचारशुद्ध ।
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १२६ ॥
तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदयीं धरावें ।
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ १२७ ॥
वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक ।
हळुहळु पुण्यश्लोक[5] । करीत जावें ॥ १२८ ॥

---

१ सरड्याचे २ विष ३ पाणी ४ गाढव ५ कीर्तिमान.

मुलाच्या चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनास शिकवावें । हळुहळु ॥ १२९ ॥
वेड्यास वेडें म्हणो नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरीच घडे दिग्विजय । निस्पृहासी ॥ १३० ॥
या कारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखतां समस्त । वाढोन येती ॥ १३१ ॥
क्रियेविण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन ।
म्हणोनी देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ १३२ ॥
जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपणें ॥ १३३ ॥
सोनें आणि परिमळें[1] । इक्षुदंडा लागती फळें ।
गौल्य[2] माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ॥१३४॥
तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त ।
व्युत्पन्न आणि वादरहित । तरी हें ही अपूर्वता १३५
मन ठेवून ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी ।
तोचि ये संसारीं । धन्य झाला ॥ १३६ ॥

रूप लावण्य अभ्यासितां नये ।
सहज[3] गुणासी न चले उपाय ।

---

१ सुगंध २ गोड ३ नैसर्गिक.

कांहीं तरी धरावी सोय । आगंतुक गुणाची ॥ १३७ ॥
मूर्खपण सांडितां जातें । शहाणपण शिकतां येतें ।
कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ १३८ ॥
मान्यतां आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी ।
चातुर्यैविण उंच पदवी । कदापी नाहीं ॥ १३९ ॥
चातुर्यें शृंगारें अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर ।
दोहींमध्यें कोण थोर । बरें पहा ॥ १४० ॥
समजलें आणि वर्तलें । तेचि भाग्य पुरुष झाले ।
या वेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ १४१ ॥
जितुका व्याप तितुकें वैभव ।
वैभवासारिखा हावभाव ।
समजले पाहिजे, उपाव । उघडचि आहे ॥ १४२ ॥
आळसें कार्यभाग नासतो । साक्षेपें होत होत होतो ।
दिसतें गोष्टी कळेना तो । शहाणा कैसा ॥ १४३ ॥
शहाणे करावे जन । पतित करावे पावन ।
पृथ्वीमध्यें भगवद्भजन । वाढवावे ॥ १४४ ॥
नयनेंचि पहावा नयन । मनें शोधावे मन ।
तैसाचि हा भाग्यवान । सकळा घटीं ॥ १४५ ॥
वैद्याची प्रचीत येईना । आणि भीड ही उल्लंघेना ।
तरी मग रोगी वांचेना । ऐसें जाणावें ॥ १४६ ॥

जितक्या मूर्ती तितक्या प्रकृती ।
सारख्या नसती आदिअंतीं ।
नेमचि नाहीं, पाहावें किती । काय ह्मणोनी ॥१४७॥
त्याहीमध्यें जो तीक्ष्ण । रिकामा जाऊं नेदी क्षण ।
धूर्त तार्किक विचक्षण । सकळां मानें ॥ १४८ ॥
उदंड करी गुप्त रुपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें यश कीर्ति प्रतापें । सीमा सांडिली ॥ १४९ ॥
ऐसी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें ।
दास ह्मणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ॥ १५० ॥
विवेकें बहुत पैसावले[1] । ह्मणोन अवतारी बोलिले ।
मनु चक्रवर्ती झाले । येणेंचि न्यायें ॥ १५१ ॥
व्याप आटोप करिती । धक्के चपेटे सोशिती ।
तेणें प्राणी सदैव होती । देखत देखतां ॥ १५२ ॥
धाकुटा भाग्यास चढला । तरी तुच्छ करिती तयाला ।
या कारणें सलगीच्या लोकाला । दुरी धरावें ॥१५३॥
नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण ।
उगेचि धरिती थोरपण । मूर्खपणें ॥ १५४ ॥
गुणेंविण वडिलपण । हें तों अवघेंचि अप्रमाण ।

१ विस्तारले — मोठे झाले.

त्याची प्रचीत प्रमाण । थोरपणीं ॥ १५५ ॥
या कारणें कोणी एके । शहाणपण शिकावें विवेकें ।
विवेक न शिकतां तुकें[1] । तुटोन जाती ॥ १५६ ॥
शहाण्यास कोणी तरी बाहाती[2] ।
मूर्खास लोक दवडून देती ।
जीवास आवडे संपत्ती । तरी शहाणे व्हावें ॥१५७॥
अहो या शहाणपणाकारणें । बहुतांचे कष्ट करणें ।
परंतु शहाणपण शिकणें । उत्तमोत्तम ॥ १५८ ॥
जो बहुतांस मानला । तो जाणावा शहाणा झाला ।
जनीं शहाण्या मनुष्याला । काय उणें ॥ १५९ ॥
आपलें हित न करी लौकिकीं ।
तो जाणावा आत्मघातकी ।
या मूर्खाएवढा पातकी । आणिक नाहीं ॥ १६० ॥
अंतरें राखतां राजी । भलत्यास भलताच नाबाजी ।
अंतरें न राखतां भाजी । मिळणार नाहीं ॥ १६१ ॥
देखोन एकांत जाणती । शहाणे अंतर परीक्षिती ।
धूर्त ते अवघेंच समजती । गुप्तरूपें ॥ १६२ ॥
स्मरण ह्मणजे देव । विस्मरण ह्मणजे दानव ।

---

१ महत्व २ बोलावती.

स्मरणविस्मरणें मानव । वर्तती आतां ॥ १६३ ॥
विवेकें विवेक जाणावा । आत्म्यानें आत्मा ओळखावा ।
नेत्रें नेत्रचि पाहावा । दर्पणीचा ॥ १६४ ॥
थोडें बहुत समजलें । पोटापुरती विद्या शिकले ।
प्राणी उगीच गर्वे गेले । मी ज्ञाता ह्मणोनी ॥१६४॥
सकळा वडील अंतरात्मा । त्यासी नेणें तो दुरात्मा ।
दुरात्मा ह्मणजे दुरी आत्मा । अंतरला तया ॥१६५॥
तया नारायणा मनीं । अखंड आठवावे ध्यानीं ।
मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें ॥ १६६ ॥
संन्यासी ह्मणजे षड्न्यासी । विचारवंत सर्व संन्यासी ।
आपुली करणी आपणासी । निश्चयेसी ॥ १६७ ॥
उपरति आणि अनुताप । तेथें कैंचें उरेल पाप ।
देहांतपें पुण्यरूप । दुसरा जन्म झाला ॥ १६८ ॥
समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी ।
या कारणें उठाउठी । भजन करावें ॥ १७९ ॥
संसारा आलियाचें सार्थक । जेथ नित्यानित्य विवेक ।
इहलोक आणि परलोक । दोनी साधिले ॥१७०॥
ननन शील लोकापाशीं । अखंड देव अहर्निशीं ।
पाहातां त्याच्या पूर्वसंचितार्शा । जाडा नाहीं ॥१७१

जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मसंस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ १७२ ॥
एकांतीं नाजुक कारभार । तेथें असावें अति तत्पर ।
त्याच्या कोटीगुणें विचार । अध्यात्म ग्रंथीं ॥ १७३ ॥
वैद्य मात्रेची स्तुती करी । मात्रा गुण कांहींच न करी ।
प्रचीतीविण तैसी परी । ज्ञानाची झाली ॥ १७४ ॥
भेद ईश्वर करून गेला । त्याच्या बापें[1] न मोडिला ।
मुखामध्यें घास घातला । तो अपानीं[2] घालावा १७५
ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करी यथासांग ।
ईश्वराचे केलें जग । मोडितां उरेना ॥ १७६ ॥
अंतरीं वसतां नारायणें । लक्ष्मीस काय उणें ।
ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ॥१७७॥
सृष्टीमध्यें सकळ जीव । सकळांस कैचें वैभव ।
या कारणें ठायाठाव । निर्मिला देवें ॥१७८॥
उदंड लोक बाजारीचे । जें जें आलें तें तें वेचें ।
उत्तम तितकें भाग्याचे । लोक घेती ॥ १७९ ॥
आपला आपण करी कुडावा[3] ।
तो आपला मित्र जाणावा ।

---

१ बा । घ्यानें २ गुदद्वारी. ३ रक्षण

आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ॥ १८० ॥
एक भरे एक रिते । रितें तें मागुतें भरते ।
भरतें ही रितें होतें । काळांतरीं ॥ १८१ ॥
ऐसी हे सृष्टीची चाली । संपत्ति दुपारची सावली ।
वयसा तरी निघोन गेली । हळूहळू ॥ १८२ ॥
जें चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पहावें ।
ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ॥ १८३ ॥
उत्तम वस्तूची परीक्षा । कैशी घडे नतद्रक्षा[1] ।
दीक्षा हीनापाशीं दीक्षा । येईल कैचीं ॥ १८४ ॥
अंतरनिष्ठ तितुके तरले ।
अंतरभ्रष्ट तितुके बुडाले ।
बाह्यात्कारें भरंगळले[2] । लोकाचारें ॥ १८५ ॥
ध्यान धरीना तो अभक्त । ध्यान धरील तो भक्त ।
संसारापासून मुक्त । भक्तांस करी ॥ १८६ ॥
एकाग्र करूनिया मन । बळेंचि धरावें साधन ।
यत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये ॥ १८७ ॥
पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें ।
सांगितले गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ॥ १८८ ॥

---

१ करंट्याला २ गुरफटले.

पूज्यपूजेसी अधिकार । उगाचि ताषवावे इतर ।
दुखवूं नये कोणाचें अंतर । ह्मणजे बरें ॥ १८९ ॥

धान्य उदंड मोजिलें । परी त्या मापी नाहीं भक्षिलें ।
विवरल्याविण तैसें झालें । प्राणीमात्रांसी ॥ १९० ॥

ऐका फडनीसांचें लक्षण । विरंग जावा नेदी क्षण ।
समस्तांचें अंतर । संभाळीत जावें ॥ १९१ ॥

बळेंविण युद्धास गेला । तो सर्वस्वी नागवला ।
शद्ब ठेवावा कोणाला । कोणें कैसा ॥१९२ ॥

जें प्रचीतीस आलें खरें । तेंचि घ्यावें अत्यादरें ।
अनुभवेंविण जीं उत्तरें । तीं फलकट जाणावीं ।

अंतरवेधी अंतर जाणे । बाहेरमुद्रा कांहींच नेणें ।
ह्मणोन विवेकी शहाणे । अंतर शोधिती ॥ १९४ ॥

अवघाच काळ जरी सेजे[3] ।
तरी अवघेच होती राजे ।
कांहीं सेजे कांहीं न सेजे । ऐसें आहे ॥ १९५ ॥

ऐकल्याविण कळलें । शिकल्याविण शहाणपण आलें ।
देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ॥ १९६ ॥

---

१ रिकामा – लोकरंजनाशिवाय २ फोल ४ अनुकूल होई.

जें जें कांहीं श्रवणीं पडेलें ।
तितकें समजोन विवरलें ।
तरीच कांहीं सार्थक झालें । निरूपणीं ॥ १९७ ॥
मन दिसतें मां धरावें । ज्याचें त्यानें आवरावें ।
आवरून विवेकें भरावें । अभ्यंतरीं ॥ १९८ ॥
विषयीं लोक श्रवणीं येती । ते वायकांकडेचि पाहती ।
चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ॥ १९९ ॥
बहुत जनास चालवी । नाना मंडळें हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥ २०० ॥
काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी ।
चटक लावून सोडावी । कांहीं एक ॥ २०१ ॥
नेणतेंपण सोडूं नये । जाणपणें फुगों नये ।
नाना जनाचें हृदय । मृदुशब्दें उकलावें ॥ २०२ ॥
उत्तम गुण प्रगटवावे । मग भल्यासीं बोलतां फावे ।
भले पाहोन करावे । शोधून, मित्र ॥ २०३ ॥
ग्रामीं ठायीं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा ।
प्राणिमात्र बोलवावा । आप्तपणें ॥ २०४ ॥
जगामध्यें जगमित्र । जिव्हेपाशीं आहे सूत्र ।

---

१ मन कांहीं दृश्य पदार्थ नाहीं का जे धरून देतां येईल.
संधान

कोठेंतरी सत्पात्र । शोधून काढावें ॥ २०५ ॥
कथा होती तेथें जावें । दुरी दीना सारिखें बैसावें ।
तेथील सकळ हार्द[1] घ्यावें । अंतर्यामीं ॥ २०६ ॥
तेथें भले आढळती । व्यापक ते ही कळों येती ।
हळूहळू मंद गती । रीघ[2] करावा ॥ २०७ ॥
स्वयें आपणास कळेना । शिकविलें तें ऐकेना ।
तयासी उपाय नाना । काय करिती ॥ २०८ ॥
कांहीं नेमक[3] आपुलें । बहुत जनासी कळों आलें ।
तेंचि मनुष्य मान्य झालें । भूमंडळीं ॥ २०९ ॥
झिजल्यावांचूनी कीर्ति कैंची ।
मान्यता नव्हे कीं फुकाची ।
जिकडे तिकडे ची ची । अवलक्षणें ॥ २१० ॥
भल्याची संगती धरीना । आपणासी शहाणे करीना ।
तो आपला आपण वैरी जाणा । स्वहित नेणे ।२११।
जेथें नाहीं उत्तम गुण । तें करंटपणाचें लक्षण ।
बहुतांसी न माने अवलक्षण । सहजचि झालें ।२१२
स्वता निस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना ।
कठीण आहे जनार्दना । राजी राखणें ॥ २१३ ॥

---

१ इंगित, हृद्गत. २ नित्यनेम.

कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।
विवेक बळें जन लावावें । भजनाकडे ॥ २१४ ॥
उत्कट[1] भव्य[2] तेंचि घ्यावें ।
मळमळीत अवघेंचि टाकावें ।
निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ २१५ ॥
उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन ।
उत्कट योग अनुष्ठान । ठायीं ठायीं ॥ २१६ ॥
उत्कट निस्पृहता धरिली ।
त्याची कीर्ति दिगंतीं फाकली ।
उत्कट भक्तीनें निवाली । भूमंडळीं ॥ २१७ ॥
कांहीं एक उत्कटेविण । कीर्ति कदापी नव्हे जाण ।
उगेंच वणवण हिंडोन । काय होतें ॥ २१८ ॥
आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तत्काळ ।
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ २१९ ॥
विवेकामध्यें सांपडेना । ऐसें तो कांहींच असेना ।
एकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडा ॥ २२० ॥
कोण कोण राजी राखले । कोण कोण मनीं भंगिलें ।
क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ॥ २२१ ॥

[1] [illegible]तीय २ कल्याण.

REFBK-0020252

REFBK-0020252